
पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 13 । 1 जुलै, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.



# सर्वांच्या सहमतीने जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणार



## अध्यक्षीय मनोगत

# तुमचे आमचे सर्वांचे सरकार

भारतीय जनता पार्टी महायुतीच्या राज्य सरकारने अर्थसंकल्प मांडला असून त्यातील तरतुदी पाहता आपले सरकार हे शेतकरी, महिला, युवा आणि सर्वसामान्य अशा सर्वांचे सरकार असल्याचे स्पष्ट होते. शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज, मागेल त्या शेतकऱ्याला सौर ऊर्जा पंप, दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रती लीटर पाच रुपये अनुदान या तरतुदी शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या आहेत. गरजू महिलांना प्रती महिना दीड हजार रुपये देण्याची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत देण्याची अन्नपूर्णा योजना, दहा हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य आणि मुलींना मोफत उच्च शिक्षण अशा तरतुदींमुळे महिलांच्या जीवनात मोठा बदल घडेल. दहा लाख युवकांना कामाचे प्रशिक्षण घेण्यासाठी दरमहा दहा हजार रुपये विद्यावेतन देण्याची योजना युवकांसाठीच्या अनेक तरतुदींमधील अत्यंत महत्त्वाची आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजना समाजातील सर्वच कुटुंबांना लागू करण्यामुळे गरीबांसोबतच असंख्य मध्यमवर्गीय कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. भाजपा महायुती सरकारच्या काळात थेट परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र पुन्हा पहिल्या क्रमांकावर आला आहे. राज्याच्या आर्थिक विकासाला चालना देऊन रोजगाराची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होण्यासाठी अर्थसंकल्पात महत्त्वाच्या तरतुदी आहेत. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी आपल्या सरकारच्या अर्थसंकल्पातील तरतुदींचा अभ्यास करून त्यांची माहिती जनतेपर्यंत पोहचवावी. या अर्थसंकल्पाबद्दल मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांचे अभिनंदन करतो. लोकसभा निवडणुकीत एनडीएला पूर्ण जनादेश मिळाल्यानंतर तिसऱ्यांदा मोदी सरकार सत्तेवर आले असून या सरकारने काम सुरू केले आहे. गेल्या दहा वर्षात पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एनडीए सरकारने देशात परिवर्तन घडविले आहे. आगामी पाच वर्षात देश विकासाच्या बाबतीत एका नव्या उंचीवर गेलेला दिसेल. विकासाच्या मार्गावरून देशाला गतीने पुढे नेतानाच संविधानाचे पावित्र्य राखणे आणि सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून कारभार करणे हे मोदी सरकारचे वैशिष्ट्य आहे. संविधान रक्षणाच्या विरोधकांच्या घोषणा किती पोकळ आहेत, हे नुकतेच २५ जून रोजी आणीबाणीच्या स्मृतीदिनी स्पष्ट झाले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७५ साली देशावर आणीबाणी लादून संविधानावर आघात केला तसेच संविधानाने नागरिकांना दिलेले मुलभूत अधिकार नाकारले. लोकसभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा. ओम बिर्ला यांनी सदनातील सदस्यांना आणीबाणीमुळे संविधानावर झालेल्या आघाताची आठवण करून दिली व आणीबाणीच्या काळात झालेल्या अत्याचारांचा निषेध केला, तर विरोधकांनी गदारोळ केला. संपूर्ण लोकसभा निवडणुकीत भाजपा संविधान बदलणार असा खोटा नॅरेटीव्ह विरोधकांनी चालविला. आता काँग्रेस सरकारने आणीबाणीत संविधानावर केलेल्या आघाताचा मुद्दा पुढे आला तर विरोधकांचे पितळ उघडे पडले. काँग्रेस आणि त्या पक्षाचे साथीदार हेच संविधानविरोधी आहेत. आणीबाणीच्या काळात देशातील लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी सत्याग्रह करून कारावास भोगणाऱ्या असंख्य लोकशाहीप्रेमी कार्यकर्त्यांना मी सादर वंदन करतो.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




०४ सर्वांच्या सहमतीने जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणार



०८ संविधानाची मूल्ये राखणारी सुप्तशक्ती



१६ आणीबाणीला अर्ध शतक पूर्ण होताना...



२० लोकशाही चिरायू राहील याची खात्री!



२३ स्मार्ट मीटर खर्चीक नव्हे फायद्याचेच!




२५ एकच लक्ष्य... नवीन मतदार नोंदणी...






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# सर्वांच्या सहमतीने जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणार

> १८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाला नुकताच प्रारंभ झाला. नूतन सदस्यांना सदस्यत्वाची शपथ देऊन अधिवेशनाचे कामकाज सुरू झाले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.



**संसदीय** लोकशाहीसाठी आजचा दिवस गौरवशाली आहे, हा दिवस वैभवशाली आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच आपल्या नव्या संसद भवनात हा शपथविधी सोहळा होत आहे. आतापर्यंत जुन्या संसद भवनात ही प्रक्रिया होत होती. आजच्या या महत्त्वाच्या दिवशी, मी सर्व नवनिर्वाचित खासदारांचे मनापासून स्वागत करतो, त्यांचे अभिनंदन करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो.

या संसदेची स्थापना भारतातील सामान्य माणसाच्या संकल्पांची पूर्तता करण्यासाठी झाली आहे. नव्या उत्साहाने, नव्या गतीने आणि नवी उंची गाठण्याची ही अत्यंत महत्त्वाची संधी आहे. ही सर्व स्वप्ने आणि या सर्व संकल्पांसह २०४७ पर्यंत विकसित भारत घडवून श्रेष्ठ भारताच्या निर्मितीचे ध्येय घेऊन १८ व्या लोकसभेचे अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. आपल्या देशाची जगातील सर्वात मोठी निवडणूक अतिशय उत्तमरित्या आणि गौरवशाली पद्धतीने पार पडली, ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे.

१४० कोटी देशवासीयांसाठी ही अभिमानाची बाब आहे. सुमारे ६५ कोटींपेक्षा जास्त मतदारांनी मतदानात भाग घेतला. ही निवडणूकही आणखी एका गोष्टीसाठी खूप महत्त्वाची ठरली, ती म्हणजे स्वातंत्र्यानंतर दुसऱ्यांदाच देशातील जनतेने एखाद्या सरकारला सलग तिसऱ्यांदा सेवा करण्याची संधी दिली आहे. आणि ही संधी ६० वर्षांनंतर आली आहे, ही एक अतिशय अभिमानास्पद घटना आहे.

जेव्हा देशातील जनतेने एखादे सरकारला तिसऱ्या कार्यकाळासाठीही पसंती दिली आहे, तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की, त्यांनी त्यांच्या हेतूंवर मोहर उमटवली आहे, त्यांच्या धोरणांवर मोहोर उमटवली आहे. जनता-जनार्दनसाठी त्यांच्या समर्पण भावनेवर शिक्कामोर्तब केले आहे आणि यासाठी मी देशवासियांचे मनापासून आभार मानतो. आम्ही गेल्या १० वर्षात हीच परंपरा रुजवण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे, कारण आमचा असा विश्वास आहे की सरकार चालवण्यासाठी बहुमत आवश्यक आहे, परंतु देश चालवण्यासाठी सहमती जास्त महत्त्वाची आहे. आणि म्हणूनच आमचा असा प्रयत्न असेल की, प्रत्येकाच्या सहमतीने, सर्वांना सोबत घेऊन भारत मातेची सेवा करू आणि १४० कोटी देशवासियांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करू.

आम्हाला सर्वांना सोबत घेऊन पुढे वाटचाल करायची आहे, संविधानाच्या मर्यादा पाळत सर्वांना बरोबर घेऊन निर्णयांना गती द्यायची आहे. १८ व्या लोकसभेत तरुण



करत, भारताची लोकशाही, लोकशाही परंपरांचे संरक्षण करत, देशाचे नागरिक असा संकल्प करतील की, आपल्या देशात जे ५० वर्षांपूर्वी जे घडले होते ज्याने लोकशाहीवर काळा डाग लावला गेला, असे कृत्य करण्याची हिंमत कोणीही करू शकणार नाही. आपण संकल्प करू, जिवंत लोकशाहीचा, आपण संकल्प करू भारताच्या राज्यघटनेने केलेल्या मार्गदर्शनानुसार, सर्वसामान्यांची स्वप्ने पूर्ण करायची आहेत.

खासदारांची संख्या चांगली आहे ही आपल्यासाठीची आनंदाची बाब आहे. आणि जेव्हा आपण १८ बद्दल बोलतो, तेव्हा ज्यांना भारताच्या परंपराविषयी माहित आहेत, जे भारताच्या सांस्कृतिक वारशाबद्दल जाणून आहेत, अशांना माहित आहे की आपल्याकडे १८ या अंकाचे मूल्य अत्यंत सात्विक मानले गेले आहे. गीतेमध्येही १८ अध्याय आहेत– त्यातूनच आपल्याला कार्य, कर्तव्य आणि करुणेचा संदेश मिळतो. आपल्याकडील पुराण आणि उपपुराणांची संख्याही १८ आहे. १८ चा मूलांक हा ९ आहे आणि ९ पूर्णतेची हमी देणारा अंक आहे. ९ पूर्णतेचे प्रतीक असेला अंक आहे. आपल्याला वयाच्या १८ व्या वर्षी मतदानाचा अधिकार मिळतो. १८ वी लोकसभा ही भारताच्या अमृत काळाची आहे, या लोकसभेची स्थापना हा देखील एक शुभ संकेत आहे.

आज आपण २४ जूनला भेटलो आहोत. उद्या २५ जून असणार आहे, जे लोक या देशाच्या संविधानाच्या प्रतिष्ठेसाठी समर्पित आहेत, जे लोक भारताच्या लोकशाही परंपरांवर विश्वास ठेवणारे आहेत, त्यांच्यासाठी २५ जून हा एक कधीही विसरता येणार नाही असा दिवस आहे. उद्या २५ जूनला भारताच्या लोकशाहीवर काळा डाग लावणाऱ्या घटनेला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. भारताची नवी पिढी हे कधीही विसरू शकणार नाही की, देशाची राज्यघटना पूर्णपणे नाकारली गेली होती. राज्यघटनेचे तीन तेरा वाजवले गेले होते, या देशाचे रुपांतर तुरुंगात केले गेले होते, लोकशाहीव्यवस्था पूर्णपणे दडपली गेली होती. आणीबाणीची ही ५० वर्षे असा संकल्प करण्याची आहेत, की आपण आपल्या संविधानाचे अभिमानाने रक्षण

देशाच्या जनतेने आम्हाला तिसऱ्यांदा संधी दिली आहे, हा एक महान विजय आहे, एक भव्य विजय आहे. त्यामुळे आमची जबाबदारीही तीन पटीने वाढली आहे. म्हणून मी आज देशाच्या जनतेला आश्वासन देतो की, तुम्ही आम्हाला दिलेली ही जी तिसरी संधी आहे त्याचं आम्ही सोनं करू. या आधी दोनदा सरकार चालवण्याचा अनुभव आम्हाला आला आहे. मी देशाच्या जनतेला आज आश्वासन देतो की,आमच्या तिसऱ्या कार्यकाळात आम्ही आधीपेक्षा तीन पट जास्त मेहनत करू आणि परिणामांमध्येही तीन पट वाढ करू आणि या संकल्पनेसह आम्ही हा नवीन कार्यभार घेत पुढे जात आहोत.

सर्व माननीय खासदारांकडून देशाला खूप अपेक्षा आहेत. मी सर्व खासदारांना विनंती करतो की जनहितासाठी, लोकसेवेसाठी आपण या संधीचा वापर करूया आणि शक्य तितकी पावले जनहितासाठी उचलूया. देशातील जनता विरोधकांकडून चांगल्या कृतीची अपेक्षा करते, परंतु आतापर्यंत जनतेला निराशा मिळाली असली तरी, कदाचित १८ व्या लोकसभेत विरोधक सामान्य नागरिकांसाठी त्यांची भूमिका निभावतील अशी अपेक्षा आहे, विरोधी पक्षाने विरोधी पक्ष म्हणून आपली भूमिका बजावावी आणि लोकशाहीची प्रतिष्ठा राखावी अशी अपेक्षा आहे आणि मला आशा आहे की विरोधक त्या अपेक्षांना पूर्ण करतील.

सभागृहात सामान्य माणसाची अपेक्षा असते ती चर्चेची, सजगतेची. लोकांना नखरे, नाटक, किंवा गोंधळ

नको असतो. लोकांना मुद्दा हवा आहे, घोषवाक्य नको आहेत. देशाला एका चांगल्या आणि जबाबदार विरोधी पक्षाची गरज आहे आणि मला खात्री आहे की या १८ व्या लोकसभेत विजयी झालेले आमचे खासदार सर्वसामान्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील.

विकसित भारताचा आपला संकल्प पूर्ण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, आपण सर्व मिळून ती जबाबदारी पार पाडू, जनतेचा विश्वास आणखी दृढ करू. २५ कोटी नागरिकांना गरिबीतून बाहेर काढल्यानंतर हा नवा आत्मविश्वास निर्माण होतो की, भारताला गरिबीमुक्त करण्यात आपण लवकरच यश मिळवू शकतो आणि ही मानवजातीची मोठी सेवा असेल. आपल्या देशातील लोक, १४० कोटी नागरिक कठोर परिश्रम करण्यात कोणतीही कसर सोडत नाहीत. आपण त्यांना शक्य तितक्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. ही एक कल्पना आहे आणि आमचे हे सभागृह या कल्पनेला वास्तवात आणण्याचा संकल्प करणारे सदन बनेल. १८ वी लोकसभा संकल्पांनी परिपूर्ण होवो, जेणेकरून सर्वसामान्यांची स्वप्ने पूर्ण होतील.

पुन्हा एकदा, मी विशेषत: नवीन खासदारांना शुभेच्छा देतो, सर्व खासदारांचे अभिनंदन करतो आणि अनेक अपेक्षांसह आपल्याला सर्वांनी मिळून जी नवीन जबाबदारी दिली आहे ती पूर्ण भावनेने पार पाडूया, याचबरोबर सर्वांना खूप खूप धन्यवाद.

● लोकसभेच्या अध्यक्षपदी ओम बिर्ला यांची निवड करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिर्ला यांना सदनातर्फे शुभेच्छा दिल्या. अमृत काळामध्ये बिर्ला दुसऱ्यांदा लोकसभा अध्यक्ष होत असल्याचे महत्त्व त्यांनी सांगितले. बिर्ला यांचा मागील पाच वर्षांचा अनुभव आणि सदस्यांचा त्यांच्यासोबतचा कामकाजाचा अनुभव यामुळे या महत्त्वपूर्ण काळात ते सदनाला चांगले मार्गदर्शन करू शकतील. अध्यक्षांचे विनम्र आणि संयत व्यक्तिमत्त्व तसेच त्यांचे स्मितहास्य त्यांना सदनाचे कामकाज चालवण्यात सहाय्यभूत ठरत असल्याबद्दल पंतप्रधानांनी कौतुक केले.

● सलग दुसऱ्या वेळेस अध्यक्ष म्हणून निवडून आलेले श्री. बिर्ला यशस्वीपणे काम करत राहतील, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. पाच वर्षांच्या कार्यकाळानंतर सलग लोकसभेच्या अध्यक्षपदी पुन्हा निवड होणारे बलराम जाखड, हे पहिले अध्यक्ष ठरले होते. त्यानंतर ओम बिर्ला, १७ व्या लोकसभेच्या यशस्वी कार्यकाळानंतर पुन्हा १८ व्या लोकसभेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारत आहेत. पंतप्रधानांनी त्यानंतर मधल्या सुमारे २० वर्षांच्या कालखंडाचा कल विशद केला. या काळात जे अध्यक्ष म्हणून निवडून आले त्यांच्यापैकी कोणी एक तर पुन्हा निवडणूक लढवली नाही किंवा ते जिंकू तरी शकले नाही. पण लोकसभा अध्यक्ष म्हणून पुन्हा निवडून येऊन ओम बिर्ला यांनी इतिहास रचला असल्याचे ते म्हणाले.


● संसद सदस्य म्हणून अध्यक्षांच्या कामकाजाच्या पद्धतीचा उल्लेख पंतप्रधानांनी केला. ओम बिर्ला यांनी त्यांच्या मतदारसंघात राबवलेल्या 'निरोगी माता आणि निरोगी मूल' या यशस्वी अभियानाविषयी पंतप्रधानांनी सांगितले. कोटा या आपल्या मतदारसंघातल्या ग्रामीण भागात आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामांची प्रशंसा पंतप्रधानांनी केली. मतदारसंघात खेळांना प्रोत्साहन दिल्याबद्दलही बिर्ला यांचे कौतुक त्यांनी केले.

● गेल्या लोकसभेत बिर्ला यांनी केलेल्या नेतृत्वाची आठवण पंतप्रधानांनी करून दिली. तो काळ आपल्या संसदीय इतिहासातील सुवर्णकाळ असल्याचे ते म्हणाले. १७ व्या लोकसभेत घेतलेल्या परिवर्तनकारी निर्णयांची आठवण करून पंतप्रधानांनी अध्यक्षांच्या नेतृत्वाची प्रशंसा केली. नारी शक्ती वंदन अधिनियम, जम्मू काश्मीर पुनर्गठन, भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता, वैयक्तिक डेटा संरक्षण विधेयक, मुस्लिम महिला विवाह अधिकार संरक्षण विधेयक, ट्रान्सजेंडर व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण विधेयक, प्रत्यक्ष कर- विवाद से विश्वास विधेयक, हे सर्व ऐतिहासिक कायदे ओम बिर्ला यांच्या अध्यक्ष कारकिर्दीत संमत झाल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले.

● लोकशाहीच्या दीर्घ प्रवासात असे अनेक थांबे आहेत; जे नवनवीन विक्रम रचण्याची संधी देतात, असे पंतप्रधान यावेळी म्हणाले. भारताला आधुनिक राष्ट्र बनवण्याच्या दिशेने १७ व्या लोकसभेत केलेल्या कार्याचे कौतुक करत भारतातील लोक १७व्या लोकसभेला तिच्या कामगिरीबद्दल भविष्यातही आदर राखतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नवीन संसद भवन माननीय अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली अमृत कालावधीचा मार्ग

## तुमची कार्यशैली खासदारांना प्रेरणा देणारी

**या सदनातील आपले बहुतांश माननीय सदस्य तुम्हाला जाणतात, तुमचे जीवनही त्यांना माहीत आहे आणि गेल्या वेळेस तुमच्याविषयी मी अनेक गोष्टी सांगितल्या होत्या. त्याची पुनरुक्ती मी टाळतो. पण एक खासदार या रूपाने, खासदार म्हणून तुम्ही ज्या पद्धतीने काम करता ते देखील जाणून घेण्यासारखे आहे आणि त्यातून बरेच काही शिकण्यासारखे आहे. मला विश्वास आहे की खासदार म्हणून तुमची कार्यशैली पहिल्यांदाच खासदार होणाऱ्या आणि तरुण खासदारांना नक्कीच प्रेरणा देईल. आपण आपल्या संसदीय मतदारसंघात निरोगी माता आणि निरोगी बाळ, हे अभियान ज्या वचनबद्धतेने चालवले, आणि सुपोषित माता या अभियानाला तुम्ही ज्या प्रकारे तुमच्या क्षेत्रात प्राथमिकता दिली, स्वतः त्यात जोडले गेलात, ते खरोखरच प्रेरणादायी आहे. राजकीय कामांव्यतिरिक्त तुमचा मतदारसंघ कोटा इथल्या ग्रामीण भागात, हॉस्पिटल ऑन व्हील्स, हे मानवसेवेचे उत्तम काम आपण निवडले आहे. यातून गावागावातल्या लोकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्यात मदत होत आहे. तुम्ही समाजातल्या शेवटच्या घटकातील लोकांचा शोध घेऊन त्यांच्यापर्यंत अनेक सामाजिक सुविधा पोहोचवता. आपण नियमित रूपाने गरिबांना कपडे, घोंगडी, ऋतूनुसार छत्री, पादत्राणे अशी जी काही गरज असेल ती पोहोचवता. आपल्या क्षेत्रातील युवकांसाठी खेळांना प्रोत्साहन देणे, ही आपली प्राथमिकता राहिली आहे. तुमचा मागील कार्यकाळ, १७ व्या लोकसभेचा कालखंड संसदीय इतिहासातील सुवर्णकाळ राहिला आहे. आपल्या अध्यक्षतेखाली संसदेमध्ये जे ऐतिहासिक निर्णय झाले, आपल्या अध्यक्षतेत सदनाच्या माध्यमातून ज्या सुधारणा झाल्या ती या सदनाची आणि आपली मोठी ठेव आहे.**



**(श्री. ओम बिर्ला यांची लोकसभा अध्यक्षपदी पुन्हा निवड झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या भाषणातून ...)**

प्रशस्त करेल, असे आश्वासन त्यांनी सभागृहाला दिले. श्री. मोदींनी विद्यमान अध्यक्षांच्या कालावधीअंतर्गत झालेल्या संसदेच्या नवीन इमारतीच्या उदघाटनाचे स्मरण केले आणि लोकशाही पद्धतींचा पाया मजबूत करण्यासाठी उचललेल्या पावलांची प्रशंसा केली. कागदविरहीत कामकाज आणि सभागृहातील चर्चेला चालना देण्यासाठी अध्यक्षांनी सुरू केलेल्या पद्धतशीर ब्रीफिंग प्रक्रियेसाठी देखील त्यांचे अभिनंदन केले.

- जी-२० राष्ट्रांमधील विधिमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या घेतलेल्या जी-२० या परिषदेसाठी केलेल्या परीश्रमांसाठी पंतप्रधानांनी अध्यक्षांची प्रशंसा केली, ज्यामध्ये विक्रमी संख्येने देश उपस्थित होते.

- संसद भवन केवळ भिंती नसून ते १४० कोटी नागरिकांच्या आकांक्षेचे केंद्र आहे. सभागृहाचे कामकाज, आचार आणि जबाबदारी आपल्या देशातील लोकशाहीचा पाया मजबूत करतात यावर त्यांनी भर दिला. १७ व्या लोकसभेच्या कामकाजाचा वेग विक्रमी ९७ टक्के राहिल्याचा पंतप्रधानांनी उल्लेख केला. कोविड महामारीच्या काळात सभागृहातील सदस्यांसाठी सभापतींनी वैयक्तिक स्पर्श आणि संसर्गाविरोधी घेतलेली काळजी यांचाही श्री मोदींनी उल्लेख केला. त्यावेळी कामकाज १७० टक्क्यांवर पोहोचले होते आणि महामारीमुळे सभागृहाचे कामकाज ठप्प होऊ न दिल्याबद्दल त्यांनी श्री. बिर्ला यांचे कौतुक केले.


- पंतप्रधान मोदींनी सभागृहाचे पावित्र्य राखण्यासाठी सभापतींनी दाखवलेल्या संतुलनाचे कौतुक केले. ज्यामध्ये अनेक कठोर निर्णय घेणे देखील समाविष्ट होते.परंपरा जपत सभागृहाची मूल्ये जपण्याचे कार्य केल्याबद्दल अध्यक्षांविषयी आपली कृतज्ञता प्रकट केली.

- १८वी लोकसभा जनतेची सेवा करून आणि त्यांची स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण करून यशस्वी होईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. आपल्या भाषणाचा समारोप करताना, पंतप्रधानांनी श्री. ओम बिर्ला यांच्यावर सोपवलेल्या निर्णायक जबाबदारीसाठी आणि देशाला यशाच्या नवीन उंचीवर नेण्यासाठी त्यांना अनेकानेक शुभेच्छा दिल्या. ■

# संविधानाची मूल्ये राखणारी सुप्तशक्ती

● गुरु प्रकाश, राष्ट्रीय प्रवक्ते

> आदिवासी समाजातील व्यक्ती महत्त्वाच्या पदांवर असल्याचे २०१४ नंतर दिसलेले आहेच, पण बाबू जगजीवन राम यांची आठवण ठेवणारे, संविधानापुढे नतमस्तक होणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार नि:पक्षपाती असल्यामुळे राखीव जागांना धक्का न लावता, वंचितांच्या आकांक्षांना पंख देणे यापुढेही सुरू राहणार आहे..



**भारताच्या** राजकीय इतिहासात ५ एप्रिल २०१६ हा दिवस अत्यंत आगळा ठरला. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या तसेच महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्टँड अप इंडिया' उपक्रम सुरू केला; पण विशेष म्हणजे, उत्तर प्रदेशात येऊन ही घोषणा करण्यापूर्वी मोदी यांनी काँग्रेसचे दिवंगत नेते बाबू जगजीवन राम यांना त्यांच्या देशासाठी केलेल्या अथक सेवेबद्दल आदरांजली वाहिली. पंतप्रधानांच्या जाहीर सभेत, बाबू जगजीवन राम यांचे छायाचित्र व्यासपीठावर ठळकपणे होते. जगजीवन राम यांचा जन्म ५ एप्रिल १९०८ रोजी झाला;पण त्यांच्या वारशाचे स्मरण आणि आधुनिकीकरण करण्यासाठी अशा प्रकारचा उपक्रम सुरू करण्याचे याआधी कुणालाही सुचले नव्हते.

मोदींच्या नेतृत्वाखालील सरकार हे नि:पक्षपाती सरकार आहे, सर्वांच्या सक्षमीकरणासाठी आणि सामाजिक न्यायावर नव्याने लक्ष केंद्रित करणारी धोरणे आखली जात आहेत, हे यातून दिसले. संसदेच्या सेंट्रल हॉलसमोर श्रद्धांजली अर्पण करणे असो की संविधानासमोर नतमस्तक होणे, संविधान दिन साजरा करणे असो की सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचे प्रतिनिधित्व सक्षम करणे असो, सामाजिक न्याय हा 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'च्या (एनडीए) सरकारसाठी कसा आधारभूत आहे हे सर्वांनी आता– एनडीएच्या तिसऱ्या कार्यकाळात तरी– सखोलपणे पाहिले पाहिजे.

लोकसभा–२०२४ निवडणुकांमध्ये, विशेषत: उत्तर प्रदेशासारख्या महत्त्वाच्या राज्यात दलित मते 'इंडिया' आघाडीकडे वळल्याच्या चर्चा मीडियामध्ये तावातावाने सुरू आहेत. हे खरे असले तरी, सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यास सरकारची बांधिलकी अतूटच होती, याकडे कोणीही दुर्लक्ष करू शकत नाही. राजकारणात काळ हा सापेक्ष असतो, त्यामुळे नजीकच्या किंवा थोड्या



लांबच्या भविष्यकाळात भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला गमावलेली मते परत मिळण्याची शक्यता कोणीच पूर्णपणे नाकारू शकत नाही. मुळात आपण हे मान्य केले पाहिजे की निवडणुका, शासन आणि धोरण यामध्ये सामाजिक न्याय महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्याकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही राजकीय पक्षाला परवडणारे नाही.

भाजपच्या नेतृत्वाखालील 'एनडीए'ने अगदी २०१४ पासूनच उपेक्षितांकडे अधिक व्यापक आणि कल्पकपणे लक्ष देण्यास सुरुवात केलेली आहे. याची अनेक उदाहरणे देता येतील. ओडिशातील भाजपच्या पहिल्या सरकारमध्ये मुख्यमंत्रीपद मोहन मांझी यांच्याकडे सोपवण्यात आले; ते चार वेळा आमदार आणि आदिवासी नेते आहेत. राज्यातील आदिवासी बांधवांशी असलेल्या अतूट नात्याने आज त्यांना या पदापर्यंत पोहोचवले आहे. द्रौपदी मुर्मू या भारताच्या पहिल्या आदिवासी राष्ट्रपतींच्या निवडीला काँग्रेसचा विरोधही इतिहासाने नोंदवलेला आहेच. हे लक्षात ठेवणे देखील महत्त्वाचे आहे की, राष्ट्रपती मुर्मू यांनी अयोध्येतील राम मंदिराच्या आतील गर्भगृहाला भेट दिली. भारतातील सर्वोत्तम नोकरशहा असे ज्यांचे वर्णन करावे लागेल ते आदिवासी समाजाचे जी सी मुर्मू आता भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) आहेत. सत्तेच्या उच्च पदावर आदिवासींचे प्रतिनिधित्व इतक्या प्रमाणात कधीही नव्हते. केंद्र सरकारने आदिवासी अस्मितेचे प्रतीक बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त २०२५ हे 'जनजातीय गौरव वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय आधीच घेतला आहे.

जीतन राम मांझी हे हार मानण्यास नकार देणारे ८० वर्षांचे 'तरुण' योद्धा.. बिहारमधील त्यांचे निवडणूक यश हे पंतप्रधान मोदी आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सार्वत्रिक निवडणुकांसाठी वेळीच केलेल्या युतीचे फळ आहे– ही युती सामाजिक न्यायाला प्राधान्य देणाऱ्या दोन पक्षांची आहे, म्हणूनच तिने एकत्र काम केले. मांझी हे २०१४ आणि २०१९ मध्ये पराभूत झाले असूनही यंदा त्यांना यश मिळाले. ते बिहारमधील अल्पसंख्याक मुसहर समुदायातील आहेत आणि त्यांची राजकीय कारकीर्द ही भारतात भेदभावाविना कोणाचाही उत्कर्ष होऊ शकतो, याची साक्ष देणारी आहे. आज ते केंद्रीय मध्यम, लघु व सूक्ष्म उद्योगमंत्री आहेत. दलितांकडेही बौद्धिक भांडवल आहे आणि त्याचा लाभ राष्ट्रउभारणीत हाऊ शकतो, हे भाजप आणि एनडीएने यापूर्वीही दाखवून दिले आहे. २००१ मध्ये, पंतप्रधान वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आदिवासी राणी झलकारीबाई यांच्या सन्मानार्थ टपाल तिकिट प्रसृत केले. केंद्रीय मंत्रिमंडळात दलित आणि ओबीसींना महत्त्वाच्या खात्यांवर नेमणे हे भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारमध्ये सामाजिक न्यायाचे प्रमाण किती आहे याचे द्योतक आहे. 'मोदी ३.०' मध्येही सामाजिक न्यायाच्या नेतृत्वाखालील सशक्तीकरणाची निरंतरता दिसून येते आहे.

२०१५ च्या आधी '२६ नोव्हेंबर' हा कायदा दिवस



म्हणून ओळखला जात होता. या सरकारच्या पहिल्या कार्यकाळातच हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला. योगायोगाने हा निर्णय आंबेडकरांच्या १२५व्या जयंती वर्षांत घेण्यात आला.  राष्ट्र-राज्य म्हणून आपल्या मूलाधारांचा सारांश 'संवैधानिक लोकशाही' या अवघ्या दोन शब्दांत सामावलेला आहे. आपली राज्यघटना आणि घटनेचे राखणदार आणि परिचालक म्हणून काम करणारे सर्वोच्च न्यायालय यांनी गेल्या अनेक वर्षांत जगासमोर एक शक्तिशाली उदाहरण ठेवले आहे. संविधान दिन हा सर्व नागरिकांना विनम्रपणे आठवण करून देतो की त्यांनी केवळ संविधान वाचलेच नाही तर ते आचरणात आणले पाहिजे. या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी भारत सरकार आणि पंतप्रधान मोदी यांचे कौतुक केले पाहिजे, कारण हे उपक्रम नि:संशयपणे भारतीय राज्यघटनेच्या अभेद्यतेची साक्ष देतात आणि आरक्षणासारख्या महत्त्वाच्या तरतुदी कधीही हटवल्या जाणार नाहीत, याचीही  ग्वाही देतात. 'संविधान दिन' हा आपल्या देशाच्या सुप्तशक्तीचा (सॉफ्ट पॉवर) एक महत्त्वाचा स्रोतदेखील आहे. न्याय, समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या राज्यघटनेच्या पायाभूत मूल्यांची भारतीय दृष्टिकोनातून वाटचाल कशी असते, हे आपल्या संवैधानिक वाटचालीने दाखवून दिलेले आहे. आपण स्वीकारलेल्या या मूल्यांचा आदर केवळ देशांतर्गतच नव्हे तर जागतिक स्तरावर केला जातो.

या प्रमुख उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की, एकेकाळी केवळ ब्राह्मण-बनियांचा पक्ष म्हणून हिणवला जाणारा भाजप आज सामाजिक न्याय देणारा पक्ष म्हणून उदयास आला आहे. आपले 'पारंपरिक' मतदार गमावण्याची जोखीम पत्करूनही भाजप आज आपल्या धोरणांच्या, सकारात्मक कृती आणि प्रशासनाच्या कक्षेत ओबीसी, दलित, आदिवासी, मागासलेले आणि सर्वात मागासलेले समुदाय समाविष्ट करण्याचे आपले नैतिक दायित्व निर्धाराने पूर्ण करत आहे.  लोकांनी केंद्र सरकारपुढे हात पसरू नयेत, त्याऐवजी सरकारने लोकांकडे, विशेषत: समाजातील उपेक्षित घटकांकडे जावे, या निकषाखाली सन २०१४ पासून अव्याहतपणे भाजपने काम केलेले आहे. एखाद्या निवडणुकीच्या आकडय़ांवरून अख्खा पक्ष किंवा सरकारची सामाजिक न्यायाची बांधिलकी यांचे मूल्यमापन करणे चुकीचे ठरेल. त्याऐवजी मूल्यमापनच करायचे तर कामगिरीचे व्हावे. त्यातून दिसेल की, उपेक्षितांचे सक्षमीकरण निरंतर होते आहे.. आतापर्यंत ही यशोगाथा असूनसुद्धा नेत्यांनी आणि पक्षाने काम थांबवलेले नाही.

**सुदर्शन रामबद्रन (धोरण-तज्ज्ञ) हे या लेखाचे सहलेखक आहेत. (सौजन्य: दै. लोकसत्ता)**

# ‘माझी लाडकी बहीण’ गरजू कुटुंबांना 3 मोफत गॅस

## महायुती सरकारचा सामान्य माणसांसाठीचा अर्थसंकल्प

> या अर्थसंकल्पात अजित पवार यांनी अन्नपुर्णा योजनेची घोषणा केली आहे. या योजनत प्रत्येक पात्र कुटुंबाला मोफत तीन गॅस सिलिंडर देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. एलपीजी गॅस प्रत्येक घराला देण्यासाठी प्रत्येक पात्र कुटुंबाला तीन गॅस सिलिंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना जाहीर करत आहेत. या योजनेचा ५२ लाख १६ हजार ४०० कुटुंबाना लाभ मिळेल. पर्यावरण संरक्षण केलं जाईल, अशी घोषणा अजित पवार यांनी केली आहे.



### वारकरी बांधवांसाठी

● पंढरपूरच्या वारीचा जागतिक वारसा नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव.

● पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या मुख्य पालख्यातील दिंडींना प्रति दिंडी २० हजार रूपये.

● ’निर्मल वारी’साठी ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी.

● मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देहू–आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मुख्य पालखी मार्गावरील सर्व वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार.



### महिलांसाठी विविध योजना

● सन २०२३–२४ पासून ’लेक लाडकी’ योजनेची सुरुवात– मुलीच्या जन्मापासून ती अठरा वर्षाची होईपर्यंत तिला टप्प्याटप्याने एकूण एक लाख एक हजार रुपये.

● ’मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ २१ ते ६० वर्ष वयोगटातील पात्र महिलांना शासनामार्फत दरमहा दीड हजार रुपये–दरवर्षी सुमारे ४६ हजार कोटी रुपये निधी.

● दिनांक १ मे, २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावाची नोंद शासकीय दस्तऐवजांमध्ये त्याचे नांव, आईचे नांव, वडिलांचे नांव व आडनांव या क्रमाने करण्याचे बंधनकारक.

● पिंक ई रिक्षा–१७ शहरांतल्या १० हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य–८० कोटी रुपयांचा निधी.

● शुभमंगल सामुहिक नोंदणीकृत विवाह योजनेत लाभार्थी मुलींना देण्यात येणारे अनुदान १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये.

● राज्यातील सर्व आरोग्य उपकेंद्रात स्तन व गर्भाशयमुखाच्या कर्करोग तपासणीसाठी उपकरणे व साहित्यासाठी ७८ कोटी रुपये.

● रुग्णांची विशेषतः गरोदर माता व बालकांची आरोग्य संस्थेत मोफत ने–आण करण्यासाठी ३ हजार ३२४ रुग्णवाहिका.

● जल जीवन मिशन कार्यक्रमातून ग्रामीण भागातील १ कोटी २५ लाख ६६ हजार ९८६ घरांना नळजोडणी पूर्ण– राहिलेल्या २१ लाख ४ हजार ९३२ घरांसाठीचे काम प्रगतीपथावर.

● **’मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना’**– या योजनेनुसार गरजू कुटुंबांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देण्यात येणार.

याचा राज्यातील ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना लाभ होणार आहे.

● **लखपती दिदी–** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ७ लाख नवीन गटांची स्थापना–बचत गटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत १५ हजार रुपयांवरुन ३० हजार रुपये वाढ.

● महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना 'उमेद मार्ट' आणि 'ई–कॉमर्स ऑनलाईन प्लॅटफॉर्म' याद्वारे आतापर्यंत १५ लाख महिला 'लखपती दिदी', या वर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दीष्ट.

● **महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना'–** अखिल भारतीय स्तरावरील महासंमेलनाचे राज्यात आयोजन.

● 'आई योजनेअंतर्गत' पर्यटन क्षेत्रातील महिला लघुउद्योजकांना १५ लाख रुपयापर्यंतच्या कर्जावरील व्याजाचा परतावा राज्य सरकारकडून मिळणार. या योजनेतून १० हजार रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे.

● **मुलींना मोफत उच्च शिक्षण–** शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय तसेच कृषि विषयक सर्व व्यावसायिक पदवी–पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित ८ लाख रुपयापर्यंतच्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्ग तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के प्रतिपूर्ती.

● या निर्णयाचा अंदाजे २ लाख ५ हजार ४९९ मुलींना लाभ–सुमारे २ हजार कोटी रुपयांचा भार

● विदर्भ आणि मराठवाडयातील १४ विपत्तीग्रस्त जिल्हयातील केशरी शिधापत्रिकाधारक ११ लाख ८५ हजार शेतकरी लाभार्थींना मे २०२४ अखेर ११३ कोटी ३६ लाख रुपये थेट रोख रक्कम अदा.

● राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि राज्यपुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेतून गेल्या तीन वर्षात २ लाख १४ हजार शेती उपकरणांच्या खरेदीसाठी १ हजार २३९ कोटी रुपये अनुदान.

● गाव तेथे गोदाम' या नवीन योजनेत पहिल्या टप्प्यात १०० नवीन गोदामांचे बांधकाम तसेच अस्तित्वातील गोदामांची दुरुस्ती.

● कापूस, सोयाबीन तसेच अन्य तेलबियांच्या उत्पादकतेत वाढ आणि मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना–सन २०२४–२५ मध्ये ३४१ कोटी रुपये निधी.

● आधारभूत किंमतीनुसार खरीप व रब्बी हंगामातील कडधान्य व तेलबियांच्या नाफेडमार्फत खरेदीसाठी १०० कोटी रुपयांचा फिरता निधी.

● खरीप पणन हंगाम २०२३–२४ मध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य.

● कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सन २०२३–२४ मध्ये ३५० रुपये प्रति क्विंटलप्रमाणे ८५१ कोटी ६६ लाख रुपये अनुदान.

● कांदा आणि कापसाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा फिरता निधी.

● खरीप पणन हंगाम २०२३–२४ मध्ये ६ लाख धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपयांप्रमाणे १ हजार ३५० कोटी रुपये प्रोत्साहन रक्कम प्रदान.

● नोंदणीकृत २ लाख ९३ हजार दूध उत्पादकांना प्रतिलिटर ५ रुपयांप्रमाणे २२३ कोटी ८३ लाख रुपये अनुदान वितरीत, राहिलेले अनुदानही दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्याकरीता प्रतिलिटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान देण्याची योजना जुलै, २०२४ पासून पुढे चालू ठेवण्यात येणार

● पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, पशुचारा आणि पशुखाद्य उत्पादन या क्षेत्रात नव उद्योजक निर्माण करण्याकरीता नवीन 'दुग्ध व्यवसाय उद्योजकता प्रकल्प'.

● शेळी–मेंढीपालन आणि कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन नवीन प्रकल्प.

● मत्स्यबाजार स्थापना तसेच मासळी विक्री सुविधांसाठी ५० कोटी रुपये निधी.

● **अटल बांबू समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खाजगी क्षेत्रावर बांबूची लागवड–** प्रतिरोपासाठी १७५ रुपये अनुदान.

● **राज्यातील पडीक जमीनीवर मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड–** नंदुरबार जिल्ह्यात १ लाख २० हजार एकर क्षेत्रावर बांबूची लागवड.

● विविध अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, वितरण प्रणालीतील सुधारणांसाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे अर्थसहाय्य **(पान १५ वर)**

# कापूस-सोयाबीन उत्पादक शेतक-यांना 5 हजार रुपयांची मदत

कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना खरीप २०२३-२४ साठी २ हेक्टर मर्यादेत ५ हजार रुपये देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवारांनी केली. तसेच गाईच्या दुधासाठी १ जुलैपासून प्रतिलिटर ५ रुपये अनुदान राज्य सरकारकडून देण्यात येईल, असं पवार म्हणाले. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला.

**राज्य** सरकारने शेतकऱ्यांसाठी २०२३-२४ पासून आर्थिकसाह्य म्हणून एक रुपयात पीक विमा, गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान, महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती या योजना राबवण्यात आल्याचंही अजित पवार म्हणाले. यावेळी अजित पवारांनी लाभार्थी संख्या आणि योजनेवर करण्यात आलेला खर्च सभागृहासमोर मांडला. राज्यात १०० नवीन गोदामे, तेलबिया पिकांच्या मूल्यसाखळीसाठी निधी, शेळी पालन आणि कांदा उत्पादक शेतकरी अनुदान, बांबू रोपे याबद्दल घोषणा केली. लोकसभा निवडणुकांच्या आचारसंहितेच्या आधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पत्रकार परिषद घेत सोयाबीन-कापूस भावांतर योजनेची घोषणा केली होती. पण आचार संहितेमुळे या योजनेचा शासन निर्णय काढला गेला नव्हता.

### शेतकऱ्यांसाठी विविध योजना

- नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी जुलै, २०२२ पासून १५ हजार २४५ कोटी ७६ लाख रूपयांची मदत.
- नोव्हेंबर-डिसेंबर, २०२३ मधील अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या २४ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना २ हजार २५३ कोटी रुपयांची मदत.
- नुकसानीच्या क्षेत्राची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करुन राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा अधिक दराने मदत.
- खरीप हंगाम २०२३ करिता ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ तर १ हजार २१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून विविध सवलती लागू.
- नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू.
- **'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने'** अंतर्गत एकूण ९२ लाख ४३ हजार शेतकरी कुटुंबांना ५ हजार ३१८ कोटी ४७ लाख रुपये अनुदान.
- **'एक रुपयात पीक विमा योजने'** अंतर्गत ५९ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ५०४ कोटी ६६ लाख रुपये रक्कम अदा.
- **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने'** अंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप.
- **'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'** अंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून ५ हजार १९० कोटी रुपये अदा केले, उर्वरित रकमेचे वाटप त्वरीत.
- नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा ६ हजार कोटी रुपये किमतीचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांत राबविण्यात येणार.
- मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पातंर्गत १ हजार ५६१ कारटी ६४ लाख रुपये किमतीच्या ७६७ उपप्रकल्पांना मंजूरी - सुमारे ९ लाख शेतकऱ्यांना लाभ.
- विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ आपत्तीग्रस्त जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक ११ लाख ८५ हजार शेतकरी लाभार्थींना मे २०२४ अखेर ११३ कोटी ३६ लाख रुपये थेट रोख रक्कम अदा. ■

# एक रुपयात पीक विमा योजनेची अंमलबजावणी अशी होणार...

● दत्ता जाधव

> यंदाच्या खरीप हंगामात एक रुपया भरून पीक विमा योजनेचा लाभ घेता येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी कशी होणार, याविषयी...



### एक रुपयात पीक विमा योजना नेमकी कशी आहे?

पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून चालू खरीप हंगामात केवळ एक रुपया भरून शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ देण्याकरिता 'सर्वसमावेशक पीक विमा योजना' राबविली जात आहे. शेतकऱ्यांनी १५ जुलैपर्यंत नोंदणी करून या योजनेत सहभाग घ्यावयाचा आहे. केंद्र शासनाने पंतप्रधान पीक विमा योजनेबाबत जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार खरीप हंगाम २०२३-२४ ते रब्बी हंगाम २०२५-२६ करिता 'सर्वसमावेशक पीक विमा योजना' (कप अँड कॅप मॉडेल ८०:११०) राबविण्यास राज्य शासनाने २६ जून २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे.

### पीक विमा योजनेत ८०:११० हे सूत्र अत्यंत महत्त्वाचे का?

पंतप्रधान पीक विमा योजनेत ८०:११० हे अत्यंत महत्त्वाचे सूत्र आहे. विमा कंपनी एका वर्षामध्ये जिल्हा समूहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रकमेच्या ११० टक्क्यापर्यंतचे दायित्व स्वीकारेल. तसेच एका वर्षातील देय पीक विमा नुकसानभरपाईची रक्कम जमा विमा हप्ता रकमेच्या ११० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास ११० टक्क्यांपेक्षा जास्तीचा भार राज्य शासन स्वीकारेल आणि जर देय पीक विमा नुकसानभरपाईची रक्कम जिल्हा समूहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रकमेपेक्षा कमी असेल तर विमा कंपनी विमा हप्ता रकमेच्या जास्तीत जास्त २० टक्के रक्कम स्वत:कडे ठेवेल व उर्वरित विमा हप्ता राज्य शासनाला परत करेल.

### एक रुपयात पीक विमा योजनेची उद्दिष्टे काय आहेत?

अतिवृष्टी, पूर, महापूर, चक्रीवादळ, अति थंडी, अति उष्णता, वावटळ यासारख्या नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळावे. पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य कायम अबाधित राहावे. नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन मिळावे. कृषी क्षेत्रासाठीच्या वित्त, पतपुरवठ्यात सातत्य राहावे, जेणेकरून उत्पादनातील जोखमींपासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबरच अन्नसुरक्षा पिकांमध्ये विविधता यावी आणि कृषी क्षेत्राचा गतिमान विकास व्हावा. कृषी क्षेत्रात स्पर्धात्मकता वाढीस लागावी आदी पीक विमा योजनेची उद्दिष्ट्ये आहेत.

### पीक विमा योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये

पंतप्रधान पीक विमा योजना अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील केवळ अधिसूचित पिकांसाठी तसेच ऐच्छिक आहे. खातेदाराच्या व्यतिरिक्त कूळ अगर भाडेपट्ट्याने शेती करणारे शेतकरीही भाग घेण्यास पात्र आहेत. या

योजनेअंतर्गत सर्व पिकांसाठी ७० टक्के जोखीमस्तर निश्चित करण्यात आला असून वास्तवदर्शी दराने हप्ता आकारण्यात येणार आहे. शेतकऱ्यांवरील विमा हप्त्याचा भार कमी करण्यासाठी खरीप हंगामासाठी दोन टक्के, रब्बीसाठी १.५ टक्के व नगदी पिकांसाठी पाच टक्के, असा मर्यादित हप्ता ठेवण्यात आला आहे. तरीही या योजनेत शेतकऱ्यांनी प्रति अर्ज केवळ एक रुपया भरून पीक विमा पोर्टलवर नोंदणी करावयाची आहे. एक रुपया वजा जाता विमा हप्त्याची उर्वरित रक्कम किंवा फरक राज्य सरकार विमा हप्ता अनुदान म्हणून विमा कंपनीला अदा करणार आहे.

### शेतकऱ्यांना मदत कशी मिळेल?

राज्य सरकारने जिल्हानिहाय पीक विमा राबविण्यासाठी पीक विमा कंपनीची निवड केली आहे. त्यानुसार, भारतीय कृषी विमा कंपनी लिमिटेड ही कंपनी जळगाव, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, वर्धा आणि रत्नागिरी जिल्ह्यांत योजनेची अंमलबजावणी करेल. फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. जालना जिल्ह्यात योजनेची अंमलबजावणी करेल. युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कं. लि. ही कंपनी छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, अमरावती, अकोला, नागपूर, परभणी, रायगड आणि नंदुरबार जिल्ह्यांत काम करणार आहे. बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ठाणे, पालघर, धुळे, पुणे, सांगली, लातूर, बुलढाणा, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा, बीड आणि वाशीम जिल्ह्यांत पीक विमा योजनेची अंमलबजावणी करणार आहे. विमा काढलेल्या शेतकऱ्याच्या शेतातील उभ्या पिकाचे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास किंवा काढणीपश्चात नुकसान झाल्यास ७२ तासांच्या आत याबाबतची सूचना संबंधित शेतकऱ्याने संबंधित विमा कंपनीला कळविणे बंधनकारक आहे. ही सूचना केंद्र शासन पीक विमा ॲपवर (क्रॉप इन्शुरन्स ॲप), संबंधित विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर, विमा कंपनीचे तालुका, जिल्हा कार्यालय, संबंधित बँक, कृषी, महसूल विभागाद्वारे द्यावी. **(सौजन्य: दै. लोकसत्ता)**

# ‘माझी लाडकी बहीण’ गरजू कुटुंबांना 3 मोफत गॅस

(पान १२ वरून)

- वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जिवीतहानी– नुकसान भरपाईच्या रकमेत २० लाख रुपयांवरून २५ लाख रुपये, कायमचे अपंगत्व आल्यास ५ लाख रुपयांवरून ७ लाख ५० हजार रुपये, गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजारावरून ५ लाख रुपये, किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपयांवरून ५० हजार रुपये अशी वाढ, शेती पिकाच्या नुकसान भरपाईकरिता देय रकमेच्या कमाल मर्यादेतही २५ हजार रुपयांवरून ५० हजार रुपये वाढ.
- सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम– १०८ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता– दोन वर्षात ६१ प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित– सुमारे ३ लाख ६५ हजार हेक्टर सिंचन क्षमता.
- महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम– १५५ प्रकल्पांच्या कालवे वितरण प्रणालीची सुधारणा– येत्या तीन वर्षात त्यामुळे सुमारे ४ लाख २८ हजार हेक्टर वाढीव क्षेत्राला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ.
- म्हैसाळ जिल्हा सांगली येथे पथदर्शी सौर ऊर्जा प्रकल्प– अंदाजित किंमत एक हजार ५९४ कोटी रुपये– सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबांना लाभ.
- स्वच्छ व हरित उर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी जनाई–शिरसाई, पुरंदर यासह सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण –४ हजार २०० कोटी रुपये खर्च.
- वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्प– नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ.
- कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरामुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळावी आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने तीन हजार २०० कोटी रुपये किंमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम.
- जलयुक्त शिवार अभियान–२ अंतर्गत मार्च २०२४ अखेर ४९ हजार ६५१ कामे पूर्ण– ६५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद.
- 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत एकूण ३३८ जलाशयातून ८३ लाख ३९ हजार ८१८ घनमीटर गाळ काढण्यात आला. ६ हजार शेतकऱ्यांना लाभ. ■

# आणीबाणीला अर्ध शतक पूर्ण होताना...

● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष

> २५-२६ जून १९७५ ची मध्यरात्र आमच्या पिढीतील कोणत्याही विचारधारेचा राजकीय कार्यकर्ता कधीच विसरू शकणार नाही. ती एक अभूतपूर्व परिस्थिती होती. १९७२ पासून गुजरात व बिहारमध्ये विद्यार्थ्यांनी सुरु केलेले भ्रष्टाचार विरोधी नवनिर्माण आंदोलन लोकनायक जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली देशभर पसरले होते. ते केवळ विद्यार्थ्यांचे आंदोलन न रहाता जनआंदोलन बनले होते.

जनमानसातील असंतोष अत्यंत शिगेला पोचला होता. त्यातच अलाहाबाद उच्च न्यायालयाने १९७५ च्या मे महिन्याच्या अखेरीला पंतप्रधान इंदिरा गांधींची निवडणूक अवैध ठरवून त्यांचे संसद सदस्यत्व रद्द केले होते. त्यामूळे देशात निर्माण झालेली राजकीय अस्थिरता कल्पना करण्याच्या पलीकडे गेलेली होती. देशातील राजकीय वातावरण नेमके काय वळण घेईल याचा अंदाज कोणालाच करता येत नव्हता. अशा वातावरणात २५ जून १९७५ च्या मध्यरात्री श्रीमती इंदिरा गांधींनी आणीबाणी लागू केल्याची घोषणा आकाशवाणीवरून केली. 'देशातील अंतर्गत शत्रू अस्थिरता निर्माण करत असून त्यामुळे देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला असल्यामुळे राष्ट्रपती फक्रुद्दीन अहमद यांनी आपले विशेषाधिकार वापरून आणीबाणी जाहीर केली आहे' अशा आशयाचे निवेदन आकाशवाणीवर करून त्यांनी ही घोषणा केली.



लोकनायक जयप्रकाश नारायण

त्यांचे हे निवेदन आकाशवाणीवरून प्रसारित होण्याच्या आधीच देशभरातील पोलीस यंत्रणा कमालीची सक्रीय झाली होती. सर्व लहानमोठ्या विरोधी पक्षनेत्यांच्या घराबाहेर बंदोबस्त लागला होता. ते लोण अगदी जिल्हास्थानच्या शहरांपर्यंत पोचले होते. काहीतरी अघटित व भयंकर होऊ घातले आहे याची चाहूल जागरूक व जाणकार नागरिकांना लागली होती पण नेमके काय घडू शकते याचा अंदाज कोणालाही करता येत नव्हता. पण ही अनिश्चितता व संभ्रम फार काळ टिकला नाही. श्रीमती गांधींच्या आकाशवाणीवरील निवेदनानंतर लगेचच सर्वत्र राजकीय विरोधकांची धरपकड सुरु झाली. काही तासांमध्ये लाखो राजकीय नेते व कार्यकर्ते तुरुंगांच्या गजाआड डांबले गेले. वृत्तपत्रांची मुस्कटदाबी सुरु झाली. सर्व प्रकारचे दळणवळण बंद पाडले गेले. अवघ्या ४८ तासांमध्ये उभा देश एक बंदिशाळा बनवला गेला आणि स्वतंत्र भारताच्या जीवनातील एक काळाकुट्ट अध्याय सुरु झाला. त्या सगळ्या घटनांना आता पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने नव्या पिढ्यांना त्या काळ्या दिवसांची व त्या काळात केलेल्या दुष्ट कारनाम्यांची माहिती देणे आवश्यक आहे. कारण ज्या मानसिकतेतून आणीबाणी लादून देशात राजकीय दडपशाहीचा वरवंटा फिरवला गेला




ती सर्वंकष सत्तावादाची मानसिकता काँग्रेसमध्ये पुन्हा प्रबळ होऊ लागली आहे आणि ज्या फॅसिस्ट प्रवृत्तीच्या विचारधारेच्या लोकांनी श्रीमती इंदिरा गांधींना घेरले होते व त्यांना बदसल्ला देऊन त्यांच्या आडून आपले लोकशाही विरोधी राजकारण करत होते त्याच प्रवृत्तीच्या लोकांनी आजच्या काँग्रेसचा कबजा घेतला आहे. त्यामुळे पन्नास वर्षांपूर्वी लोकशाहीला निर्माण झालेला धोका नजिकच्या भविष्यात देखील होऊ शकतो हे लक्षात घेतले पाहिजे.

आणीबाणीत इंदिरा गांधींनी राजकीय दडपशाहीचा वरवंटा फिरवून राजकीय विरोधकांना संपवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी सरकारी यंत्रणेचा मनमुराद गैरवापर केला. त्यात हजारो लोक मारले गेले, हजारोंचे संसार उद्ध्वस्त झाले. अनेक संस्था कोलमडून गेल्या ज्या परत उभ्या राहिल्या नाहीत. पण या सगळ्याच्या पलीकडे जाऊन त्यांनी भारताची न्यायव्यवस्था आणि संसदेवर देखील आपल्या राक्षसी दडपशाहीचा वरवंटा फिरवला. या सर्वोच्च संस्था आपल्या बटीक बनवण्यासाठी भारताच्या संविधानाची, आपल्या राज्यघटनेची जी क्रूर मोडतोड केली ती अधिक विघातक होती. त्यांच्या या विध्वंसक उद्योगाची माहिती देशाच्या प्रत्येक नागरिकाला असायला हवी.

### अडतिसावी घटना दुरुस्ती
### २२ जुलै – १ ऑगस्ट १९७५

इंदिरा गांधी व काँग्रेसने मनाला येईल त्याप्रमाणे संविधानाची मोडतोड करण्याची सुरुवात 'आणीबाणी लागू करण्याच्या घोषणे'पासूनच केली होती. ज्या पद्धतीने राष्ट्रपतींच्या नावाने एक अधिसूचना काढून देशात तात्काळ आणीबाणी लावली गेली त्या पद्धतीने देशांतर्गत आणीबाणी जाहीर करण्याची तरतूदच आपल्या संविधानात त्या दिवसापर्यंत– २५ जून १९७५ पर्यंत नव्हती. त्या अर्थाने जाहीर केलेली आणीबाणी पूर्णपणे घटनाबाह्य होती. आपल्या दडपशाहीच्या कृतीला घटनात्मक मान्यता आहे हे दाखवण्यासाठी २२ जुलै १९७५ रोजी, आणीबाणी लागू केल्यानंतर अठ्ठावीस दिवसांनी इंदिरा गांधींनी ही घटनादुरुस्ती केली. ही घटनादुरुस्ती 'पूर्वलक्ष्यी प्रभावाने' (Retrospective effect) लागू केली. हा 'पूर्वलक्ष्यी प्रभावा'चा प्रकार देखील पूर्णपणे घटनाबाह्य, बेकायदेशीर व अनैतिक होता.

ह्या दुरुस्तीने घटनेची १२३, २१३, २३९ब, ३५२, ३५६, ३५९, आणि ३६० एवढी कलमे बदलली गेली. ह्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून राष्ट्रपतींना देशांतर्गत कारणांसाठी केवळ अधिसूचना काढून आणीबाणी लागू करून सर्वंकष अधिकार आपल्याकडे घेण्याची व्यवस्था केली गेली. ह्याच दुरुस्तीनुसार राष्ट्रपतींच्या अशा अधिसूचनेला आक्षेप घेता येणार नाही किंवा न्यायालयात आव्हान देता येणार नाही, राष्ट्रपतींनी काढलेली अधिसूचना चर्चा किंवा समीक्षा करण्यापलीकडे असेल असेही स्पष्ट केले गेले. (This mendment made the declaration of emergency by the President nondebatable and non-justiciable)

ह्या दुरुस्तीने न्यायव्यवस्थेचे अनेक अधिकार काढून घेतले. केंद्र सरकारच्या सर्व कारवाया व निर्णय न्यायालयीन चिकित्सेच्या बाहेर काढले गेले व केंद्र सरकारला न्याययंत्रणेपासून पूर्ण संरक्षण दिले गेले. संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत हक्क व अधिकार काढून घेण्याचे किंवा स्थगित करण्याचे अधिकार ह्या घटनादुरुस्तीने राष्ट्रपतींना म्हणजेच केंद्र सरकारला दिले. एवढेच नाही तर देशातील विविध राज्य सरकारना 'मार्गदर्शन करण्या'चे अधिकार देखील राष्ट्रपतींना बहाल

केले गेले. थोडक्यात राज्य सरकारांची मर्यादित मोकळीकसुद्धा काढून घेतली गेली. ह्या अडतिसाव्या घटना दुरुस्तीपासून अशा पद्धतीने दडपशाहीला उपयुक्त दुरुस्त्यांची एक मोठी मालिकाच सुरु झाली आणि बेचाळीसाव्या घटना दुरुस्तीने त्यावर कळस चढवला.

### एकोणचाळीसावी घटना दुरुस्ती
### १० ऑगस्ट १९७५

ह्या दुरुस्तीने कलम ७१ व ३२९ ही दोन कलमे बदलली गेली, ३२९अ असे नवे कलम घुसडले गेले. त्याचबरोबर सरकारने केलेल्या विशिष्ट कायद्यांना न्यायालयीन छाननीपासून संरक्षण देणाऱ्या सूची क्र.९ मध्ये बदल केले गेले. इंदिरा गांधींची निवडणूक अवैध ठरवणारा अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल रद्दबातल करण्यासाठी ही घटना दुरुस्ती केली गेली. एवढेच नाहीतर पंतप्रधान पद न्यायालयीन चिकित्सेच्या कक्षेतून कायमचे बाहेर काढले गेले. कोणत्याही प्रकारचे निवडणूक गैरप्रकार झाले तरीही राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा सभापती व पंतप्रधान यांच्या विरुद्ध दावा दाखल करता येणार नाही अशी तरतूद या दुरुस्तीने केली होती.

### चाळीसावी घटना दुरुस्ती
### २७ मे १९७६

ह्या दुरुस्तीने राज्य सरकारांच्या अधिकारांचा आणखी संकोच केला गेला. 'विशेष आर्थिक क्षेत्र' जाहीर करून विकसित करण्यासाठी राज्य सरकारला बाजूला सारून थेट कायदा करण्याचे अधिकार संसदेला देण्यात आले. सर्व प्रकारची खनिजे ही राष्ट्रीय संपत्ती घोषित करून त्याबद्दलचे निर्णय घेण्याचे अधिकार केंद्र सरकारने स्वत:कडे घेतले. भू संपादन व जमिनींशी संबंधित कायदे ९ क्रमांकाच्या सूचीत टाकून राज्य सरकारांचे व न्यायालयांचे अधिकार कमी केले गेले.

### एक्केचाळीसावी घटना दुरुस्ती
### ७ सप्टेंबर १९७६

घटनेच्या ३१६ व्या कलमात दुरुस्ती करून राष्ट्रपती, पंतप्रधान व राज्यपाल हे त्या त्या पदांवरून मुक्त झाले अथवा निवृत्त झाले तरी त्यांच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदवता येणार नाही अशी व्यवस्था या दुरुस्तीच्या माध्यमातून केली गेली.

### बेचाळीसावी घटना दुरुस्ती
### १ सप्टेंबर १९७६ ते १ एप्रिल १९७७



भारतीय संविधानाच्या इतिहासात बेचाळीसावी घटनादुरुस्ती 'लघु संविधान' (Mini Constitution) म्हणून ओळखली जाते. 'अनुभवांच्या आधारे घटना दुरुस्तीच्या गरजेचा अभ्यास करण्यासाठी' (to study the question of amendment of the Constitution in the light of experience) पंतप्रधान इंदिरा गांधींनी तेव्हाचे परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग यांच्या अध्यक्षतेखाली जुलै १९७६ मध्ये एक समिती नेमली. या समितीने दिलेल्या अहवालाच्या आधारे १ सप्टेंबर १९७६ रोजी ह्या दुरुस्तीचे विधेयक लोकसभेत मांडले गेले. हे विधेयक एका फटक्यात संविधानाची प्रस्तावना, कलम ३१ पासून ३६६ पर्यंतच्या कलमांपैकी ३१, ३१क, ३९, ५५, ७४, ७७, ८१, ८२, ८३, १००, १०२, १०३, १०५, ११८, १४५, १५०, १६६, १७०, १७२, १८९, १९१, १९२, १९४, २०८, २१७, २२५, २२६, २२७, २२८, ३११, ३१२, ३३०, ३५२, ३५३, ३५६, ३५७, ३५८, ३५९, ३६६, ३६८ रपव ३७१फ अशी एकंदर सत्तेचाळीस कलमे बदलणार होते. त्याशिवाय ४अ, १४अ, ३१ड, ३२अ, ३९अ, ४३अ, ४८अ, १३१अ, १३९अ, १४४अ, २२६अ, २२८अ आणि २५७अ अशी तेरा नवी कलमे समाविष्ट करणार होते. चार कलमांना पर्यायी कलमे देणार होते आणि केंद्र राज्य संबंधांची व्याख्या करून राज्यांचे अधिकार निश्चित करणारी सातवी सूची बदलणार होते. राज्यांचे अधिकार कमालीचे संकुचित करणाऱ्या तरतुदी या विधेयकात होत्या. एकूणच केंद्र सरकार सर्वंकष सत्ताधारी होईल अशी रचना या दुरुस्तीच्या मदतीने केली जाणार होती. ह्याच घटना दुरुस्तीच्या मदतीने १९७५ सालातच अपेक्षित असलेल्या लोकसभा व विधानसभांच्या निवडणुका पुढे ढकलून लोकसभा व विधानसभांची मुदत एक वर्षासाठी वाढवली गेली. राष्ट्रपतींना आवश्यक वाटल्यास ही स्थगिती अधिक वाढवण्याची तरतूद त्यात होतीच.

आपले संविधान तयार करण्यासाठी मूळ घटना समितीने जवळ जवळ तीन वर्षे काम केले होते. त्या समितीत ३८९ सभासद होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समिती ११४ दिवस काम करत होती. पण 'अनुभवांच्या आधारे त्या संविधानात काय दुरुस्त्या करायला हव्या आहेत' ते ठरवण्यासाठी इंदिरा गांधींनी केवळ एका सदस्याची समिती नेमली आणि त्या समितीने अवघ्या एक दीड महिन्यात आपला अहवाल दिला. त्या अहवालाच्या आधारावर एवढे सर्वंकष बदल करण्याचा घाट इंदिरा गांधी व काँग्रेसने घातला. भारतीय राज्यघटनेचे मूळ स्वरूप पूर्ण बदलून टाकणारे हे बदल होते. या बदलांमुळे राज्यांचे अधिकार अत्यंत कमी होणार होते व त्यायोगे आपल्या राज्य घटनेने स्वीकारलेले संघराज्याचे तत्व झुगारून देऊन सर्वंकष सत्ता केंद्र सरकारच्या हातात एकवटणार होती.

नागरिकांचे मूलभूत अधिकार काढून घेण्याचे काम ३८व्या घटना दुरुस्तीने केलेच होते. पण ते पुरेसे वाटत नसल्यामुळे ४२व्या दुरुस्तीच्या माध्यमातून 'नागरिकांचा जगण्याचा अधिकार सुद्धा काढून घेण्याचे सामर्थ्य' सरकारला दिले गेले. जनतेचे सर्व प्रकारचे आचार, विचार, प्रचार स्वातंत्र्य, आंदोलन करण्याचा हक्क देखील हिरावून घेतले गेले. वृत्तपत्र स्वातंत्र्यावर तर कधीच घाला घालून झाला होता. प्रसिद्ध होणारी ओळ न ओळ सरकारी तपास यंत्रणेकडून मान्यता घेऊनच प्रसिद्ध केली पाहिजे हा दंडक रूढ झाला होता. न्याययंत्रणा सरकारच्या निर्देशानुसार काम करेल हेही या दुरूस्तीने स्पष्ट केले.

जगाच्या पाठीवर कुठेही कोणी केलेले नाही असे संविधानाच्या प्रस्तावनेत दुरुस्ती करण्याचे अजब काम या दुरुस्तीच्या माध्यमातून केले गेले. संविधान सभेने खूप व्यापक चर्चेनंतर 'समाजवाद व Secular' हे शब्द घटनेत समाविष्ट करायला नकार दिला होता. ती भूमिका पं.नेहरूंपासून डॉ.आंबेडकरांपर्यंत सर्वांची होती. पण इंदिरा गांधी व काँग्रेसने संविधान सभेची ती मूळ भूमिकाच मोडीत काढली आणि 'समाजवाद व Secular' हे शब्द कोणत्याही चर्चेशिवाय घटनेच्या प्रस्तावनेत घुसडले.

इंदिरा गांधी व काँग्रेस एवढ्या व्यापक दुरुस्त्या करून घटनेचा मुख्य ढाचा पूर्णपणे बदलून टाकत असताना संसदेतील विरोधी बाकांवर कोणी नव्हते. कारण ते सर्व तुरुंगात होते. स्टालिन आणि माओची कार्यपद्धती वापरून त्यांच्या विचारांच्या दिशेने जाण्याचा तो आजवरचा सर्वात मोठा प्रयत्न होता.

रा.स्व.संघ, जनसंघ व देशातील अन्य अनेक विरोधी पक्ष, विद्यार्थी संघटना एकत्र येऊन आणीबाणीविरोधात कडवा संघर्ष करत होते. अर्थात कम्युनिस्ट इंदिरा गांधींबरोबर होते. महाराष्ट्रात शिवसेना आणीबाणीचे समर्थ करत होती. सरकारी यंत्रणा व काँग्रेस संघटनेने मिळून चालवलेल्या अत्याचारांमुळे जनतेत असंतोष वाढत चालला होता. त्या आंदोलनाच्या दबावामुळे इंदिरा गांधींना निवडणुका घ्याव्या लागल्या. त्यात त्यांचा पराभव झाला. जनता पार्टीचे सरकार आले, ज्यात पूर्वीचा जनसंघ सामील होता. त्या जनता सरकारने ४३ व ४४ व्या घटना दुरुस्त्या करून काँग्रेसने केलेली घटनेची मोडतोड पूर्ण दुरुस्त केली व मूळ ढाचा बऱ्याच प्रमाणात पुन्हा प्रस्थापित केला.

ह्या सगळ्या प्रकरणातील आजचा क्रूर विनोद हा आहे की ज्या इंदिरा गांधी व काँग्रेसने हा फॅसिस्ट डाव टाकला त्याच गांधी व काँग्रेसचे वारस आज संविधानाच्या नावाने गळा काढून जनतेची दिशाभूल करत आहेत. आज जे जे नेते 'संविधान बचाव' म्हणून आरडाओरडा करत आहेत ते किंवा त्यांचे पूर्वज त्या वेळेला, पन्नास वर्षांपूर्वी इंदिरा गांधी व काँग्रेस यांचे समर्थन करत होते, आणीबाणी योग्यच आहे म्हणून सांगत होते. आजही त्यांचा मनसुबा तोच आहे. त्यांना जर संधी मिळाली तर इंदिरा गांधींच्या सर्वंकष सत्तावादाकडे जायला त्यांना वेळ लागणार नाही. कारण आजही त्यांचे सल्लागार चीनशी लागेबांधे बाळगून आहेत. पंतप्रधान मोदी संसद सदस्यत्वाची शपथ घेत असताना राहुल गांधी यांनी केलेले असभ्य वर्तन त्यांच्या फॅसिस्ट प्रवृत्तीचे प्रदर्शन करणारे होते. काँग्रेसवर कब्जा करून इंदिरा गांधींभोवती गोळा झालेल्या डाव्या गोतावळ्याने त्यांना अत्याचारी सर्वंकष सत्तावादाकडे ढकलत नेले. पन्नास वर्षांपूर्वी त्याचे दुष्परिणाम संपूर्ण भारताला भोगावे लागले. आज काँग्रेस पुन्हा त्याच वळणावर, त्याच पवित्र्यात उभी असून राहूल गांधी यांच्या भोवती गोळा झालेला गोतावळा अधिक विखारी आणि घातक आहे. त्यांची वाटचाल इंदिरा गांधींनी स्वीकारलेल्या सर्वंकष सत्तावादाच्या दिशेने सुरु आहे. आणीबाणीला अर्धे शतक पूर्ण होत असताना देशासमोर निर्माण होत असलेला हा धोका सर्वांनी समजून घेतला पाहिजे. ■

# लोकशाही चिरायू राहील याची खात्री!




आणीबाणी विरोधात तत्कालिन जनसंघाचे नेते डॉ.अरविंद लेले यांनी पुण्यात घेतलेली सभा. या सभेला उपस्थित असलेल्या पोलिसांची संख्या पाहून आणीबाणीत कशी दडपशाही होती, याची कल्पना नव्या पिढीला येईल.

● **प्रकाश जावडेकर,** माजी केंद्रीय मंत्री

> मोदी सरकार घटना बदलणार आहे, आरक्षण रद्द करणार आहे, असे चित्र लोकसभा निवडणुकीत निर्माण करण्यात आले, मात्र प्रत्यक्षात काँग्रेसने घटना कशी गुंडाळून ठेवली होती, न्यायालयांवर किती बंधने आणली होती आणि सर्वसामान्यांचे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य कसे हिरावून घेतले होते, हे आज ५० वर्षांनंतरही विसरता कामा नये.

**भारतात** लोकशाही आहे, परंतु काँग्रेसने १९७५ मध्ये ही लोकशाही पुरती मोडून टाकली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना पायदळी तुडविली. तो मोठा वाईट कालखंड होता. भविष्यात अशा कोणत्याही गोष्टी पुन्हा घडू नयेत आणि संविधान मजबूत राहावे यासाठी आज ५० वर्षांनंतर त्या काळाचे स्मरण आवश्यक ठरते. आणखी एक संदर्भ आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मोदी सरकार घटना बदलून आरक्षण काढून टाकणार, अशी अफवा काँग्रेस व 'इंडी' आघाडीकडून पसरविण्यात आली. पण प्रत्यक्ष घटनेची मोडतोड कोणी केली आणि या साऱ्या चोराच्या उलटया बोंबा कशा आहेत, हे समजून घेणेसुद्धा महत्त्वाचे आहे.

१९७५ मध्ये इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान होत्या. पण १२ जून १९७५ ला दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. गुजरातमध्ये काँग्रेसचा पराभव झाला आणि हा पराभव

साधासुधा नव्हता कारण सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी संयुक्त मोर्चा स्थापन केला व हा मोर्चा यशस्वी झाला. हा पराभव काँग्रेसच्या जिव्हारी लागला. त्याच दिवशी दुसरी घटना घडली. १२ जून रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक भ्रष्टाचाराच्या आरोपावरून रद्दबातल ठरविली. त्यामुळे त्यांचे पंतप्रधानपदी राहणेच घटनाबाह्य ठरले. काहीही करून खुर्चीला चिटकून राहायचे आणि पंतप्रधानपद वाचवायचे, एवढया एकाच उद्देशाने हे आणीबाणीचे शस्त्र उपसण्यात आले. २५ जूनला विरोधी पक्षांच्यावतीने दिल्लीत रामलीला मैदानावर फार मोठा मेळावा झाला. त्यात सर्व प्रमुख नेत्यांनी मते मांडली. या मेळाव्याला जनतेचा उदंड प्रतिसाद होता. भ्रष्टाचार आणि महागाई या दोन मुद्यांवर काँग्रेसला धडा शिकवण्याचा निर्णय त्यावेळी झाला. अर्थातच हा धडा लोकशाही मार्गाने शिकवायचा असेही निश्चित करण्यात आले.

इंदिरा गांधींच्या घरी त्यावेळी मोठी खलबते सरू होती. काय करता येईल, यावर विचार करण्यासाठी सिद्धार्थ शंकर रे यांना बोलवून घेण्यात आले. त्यांनी घटनेच्या ३५२ व्या कलमानुसार आणीबाणी लावण्याचा प्रस्ताव दिला. तो प्रस्ताव घेऊन ते दोघेच राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांच्याकडे गेले. हा प्रस्ताव मंत्रिमंडळाचा आहे का, असे न विचारता राष्ट्रपतींनी त्यावर लगेच अंमलबजावणी केली आणि आणीबाणी जारी करण्याचा अध्यादेश काढला. मंत्रिमंडळाची बैठक आवश्यक असते म्हणून ती २६ जूनला सकाळी सहा वाजता घेण्यात आली आणि त्यात ही शिफारस केली गेली.

संजय गांधी आणि त्यांची टोळी सक्रिय झाली. तत्पूर्वीच आणीबाणी लागू झाली होती आणि लगेचच देशातील शेकडो राजकीय कार्यकर्ते, नेते, खासदार, आमदार यांना रातोरात अटक झाली. त्याची बातमीसुद्धा येता कामा नये म्हणून त्याच रात्री सर्व वर्तमानपत्रांच्या कार्यालयांची वीज बंद करण्यात आली. एकेक पोलीस अधिकारी प्रत्येक वर्तमानपत्रात पाठवण्यात आला. त्यांनी तपासल्याशिवाय कोणतीही बातमी न देण्याचा आदेश सरकारने काढला. त्यामुळे पोलीसच संपादक झाल्याचे चित्र निर्माण झाले. ही आणीबाणी लावण्यामागे इंदिरा गांधींचा पक्का विचार होता की देशाला शॉक ट्रीटमेंटची गरज आहे आणि त्यासाठी हेच टोकाचे पाऊल उचलण्याची गरज आहे.

राजकीय नेते, कार्यकर्त्यांना 'मिसा' कायद्यानुसार अटक करण्यात आली. त्यात अटकेचे कोणतेही कारण स्पष्ट करण्यात आले नव्हते. केवळ देशातली शांतता सुव्यवस्था बिघडू शकते असे सांगून अटकसत्राला प्रारंभ झाला. मिसा कायद्याखाली न्यायालयात जाण्याचा मार्गही काँग्रेसने शिल्लक ठेवला नव्हता. कारण एकापाठोपाठ एक घटना दुरुस्त्या करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेची पूर्ण मोडतोड करण्याचा चंगच काँग्रेसने बांधला होता.

यासाठी पक्षांतर्गत एक 'स्वर्णसिंग समिती' नेमण्यात आली. त्या समितीने केवळ काँग्रेस नेत्यांशी दहा दिवसांत चर्चा केली आणि घटना संपुष्टात आणणाऱ्या अनेक शिफारशी केल्या. त्या शिफारशी आजही उपलब्ध आहेत. त्या कोणीही अभ्यासाव्यात, म्हणजे काँग्रेसचे खरे रूप कळेल. या समितीने जे उपाय सुचविले त्याच आधारावर चार मोठया घटनादुरुस्त्या करण्यात आल्या. त्यात कुख्यात बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीचाही समावेश होता. या दुरुस्तीने देशवासीयांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. बोलण्याचे, लिहिण्याचे, अभिव्यक्तीचे आणि संघटनेचे स्वातंत्र्य त्याचबरोबर आंदोलन करण्याचे स्वतंत्र उरले नाही. न्यायालयांच्या अधिकारांवर मर्यादा आणणेसुद्धा या एका घटनादुरुस्तीने साधले. हा प्रवाससुद्धा चित्तथरारक होता.

इंदिरा गांधींची निवडणूक रद्दबातल ठरवण्याविरुद्ध त्यांनी जे अपील केले होते ते ११ ऑगस्ट १९७५ रोजी सर्वोच्च न्यायालयापुढे येणार होते. त्याआधी ही घटना दुरुस्ती करून आणि ती पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू करून, न्यायालयाला या निवडणुकीसंदर्भातील याचिकांप्रकरणी निकालच देता येणार नाही, अशी तरतूद या घटनादुरुस्तीतून करण्यात आली. हे विधेयक ७ ऑगस्ट रोजी लोकसभेत आणि ८ ऑगस्टला राज्यसभेत संमत झाले. १० ऑगस्टला १७ राज्यांच्या विधानसभांची विशेष अधिवेशने भरवून हे विधेयक संमत करून घेण्यात आले आणि त्याच दिवशी त्याचे नोटिफिकेशन होऊन हा कायदा लागू झाला. त्यामुळे ११ ऑगस्टला न्यायालय भरले, त्यावेळेला न्यायालयाच्या हातात कोणताही अधिकार उरला नव्हता.

सध्या न्यायालये, तातडीने प्रकरणांची सुनावणी करतात, सरकारचे कायदे अवैध ठरवतात, परंतु त्यावेळी मात्र तसे कोणी केले नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्याचा




परिणाम म्हणजे इंदिरा गांधींची खुर्ची वाचली. काँग्रेसचा हा आणीबाणीचा अट्टहास तेवढयासाठीच होता. काँग्रेस नेते त्यावेळी कोर्टाला 'कमिटेड ज्युडीशियरी' म्हणत होते.

या आणीबाणीविरुद्ध सर्व विरोधी पक्षांनी जोरदार लढा दिला. त्यात सर्व नेते–कार्यकर्ते त्यात सहभागी झाले. पण वस्तुस्थिती ही आहे की ज्या एक लाख ११ हजार कार्यकर्त्यांनी सत्याग्रह केला वा नेत्यांना मिसाअंतर्गत अटक झाली त्यापैकी एक लाखाहून अधिक कार्यकर्ते हे संघ परिवाराचे होते. या देशातील घटना जेव्हा संकटात आली, त्यावेळी संघ परिवाराने दिलेले हे योगदान कधीच विसरता येणार नाही.

१८ जानेवारी १९७७ रोजी इंदिरा गांधींनी २० मार्च रोजी निवडणुका होतील, असे जाहीर केले. अनेक नेत्यांचे असे म्हणणे होते की, जनतेला आणीबाणीत काय झाले ते माहीत नाही. आपल्याला उमेदवार, पैसे आणि साधने मिळणार नाहीत. जनता पक्षाचा दारुण पराभव होईल आणि इंदिराजी म्हणतील की, माझ्या आणीबाणीच्या निर्णयावर जनतेने शिक्कामोर्तब केले. परंतु, जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मोरारजी देसाई यांनी ५० दिवसांचे आव्हान स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

५० दिवसांत अक्षरश: क्रांती झाली. जसजसे जनतेला अत्याचाराच्या कहाण्या कळत गेल्या, तसा काँग्रेसवरचा राग वाढत गेला. अभूतपूर्व प्रचार मोहीम राबविली गेली. प्रत्येक सभेत उपस्थित सामान्य नागरिकांनी व्यासपीठासमोर पैसे दिले आणि नंतर मतेही दिली. त्यामुळे इंदिरा गांधींचा रायबरेलीत आणि संजय गांधींचा अमेठीत पराभव झाला. जनतेने पैसे, समर्थन आणि मते दिली आणि त्याचा परिणाम म्हणून जनता पक्षाच्या २९५ जागा निवडून आल्या. नंतर आलेल्या जनता पक्षाच्या सरकारने ही बेचाळिसावी आणि आधीच्या घटनादुरुस्त्या आणि कायद्यात केलेले बदल मागे घेतले, ते निरस्त केले. आता तर जवळजवळ अशी तरतूद आहे की केवळ लष्कराचे बंडसदृश स्थिती असेल, तरच आणीबाणी आणता येते. केवळ लोकशाहीमध्ये लोक निदर्शन करतात, विरोध करतात, म्हणून आणीबाणी आणता येणार नाही. असा कडेकोट बंदोबस्त जनता पार्टी सरकारने केला आहे. लोकशाही स्वातंत्र्याचा हा लढा कायम सर्वांना स्फूर्ती देणार आहे. आम्ही त्यात प्रत्यक्ष सहभागी होतो, त्यामुळे आम्हाला तर तो विशेष कालखंड वाटतो. भारताची लोकशाही चिरायू राहील याची मला खात्री आहे.

**(सौजन्य: दै. लोकसत्ता)**

# स्मार्ट मीटर खर्चीक नव्हे फायद्याचेच!

● विश्वास पाठक, प्रदेश सहमुख्य प्रवक्ते

अचूक शुल्क आकारणी, वीजवापराची माहिती नियमितपणे मिळणे आणि खर्चावर नियंत्रण ठेवण्याची सुविधा यामुळे विजेचे स्मार्ट मीटर किंवा प्रीपेड मीटर हे ग्राहकांसाठी वरदानच ठरणार आहेत. प्रीपेड मीटरमुळे वीज बिल वाढेल, हा निव्वळ अपप्रचार आहे.

**सध्या** विजेचे स्मार्ट मीटर हा विषय चर्चेत आहे. तो खूप तापविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. 'महाराष्ट्र वीज ग्राहक संघटने'चे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी त्यात पुढाकार घेतल्याचे दिसते. संघटनेच्या वतीने स्मार्ट मीटरविरोधात निवेदने प्रसिद्ध करण्यात आली आहेत. त्यामध्ये मांडण्यात आलेले मुद्दे घेऊन अनेक संघटना, कार्यकर्ते आणि काही राजकीय पक्षही स्मार्ट मीटरला विरोध करत आहेत.

या स्मार्ट वीज मीटरच्या विरोधात सुरू असलेल्या अभियानातील एक प्रमुख मुद्दा असा की, प्रीपेड स्मार्ट मीटरला विरोध करावा. धक्कादायक बाब अशी आहे की, वर्षभरापूर्वी २०२३ मध्ये 'महाराष्ट्र वीज ग्राहक संघटने'च्या वतीने एक निवेदन प्रसिद्ध करण्यात आले होते. त्याद्वारे वीज ग्राहकांना जाहीर आवाहन करण्यात आले होते की, ज्यांना अतिरिक्त सुरक्षा ठेव द्यायची नसेल त्यांनी प्रीपेड मीटर लावण्यासाठी महावितरणकडे अर्ज करावेत. या प्रसिद्धिपत्रकाबरोबरच ग्राहकांनी प्रीपेड मीटर मिळण्यासाठी अर्ज कसा करावा याचा तयार नमुनादेखील दिला होता. या प्रसिद्धिपत्रकासंदर्भातील बातम्या दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांत प्रसिद्धही झाल्या होत्या. संघटनेची सध्याची भूमिका पाहता, असा प्रश्न निर्माण होतो की, स्मार्ट मीटरच्या



रूपाने वीज ग्राहकांना प्रीपेड मीटर मोफत मिळण्याची संधी निर्माण झाल्यावर होगाडे यांनी प्रीपेड स्मार्ट मीटरच्या विरोधात मोहीम का सुरू केली असेल?

'महाराष्ट्र वीज ग्राहक संघटने'ने स्मार्ट मीटरविषयी जो प्रचार सुरू केला आहे, त्यामुळे सामान्य ग्राहकांच्या मनात शंका निर्माण होऊ शकते. स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या शंकांचे निरसन झाल्यानंतरच त्यांच्यासाठी ही नवी मीटर्स बसविली जातील, असे आधीच स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या स्मार्ट मीटर केवळ सरकारी कार्यालये, महावितरणचे ट्रान्सफॉर्मर्स आणि फीडर्सना बसविण्यात येत आहेत आणि ती प्रीपेड नाहीत.

अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञान वापरून वीज वापराबाबत अचूक आणि पारदर्शी नोंदींची व्यवस्था महावितरण सरकारी कार्यालये आणि स्वत:पासूनच उपलब्ध करून देत आहे. घरगुती वीज ग्राहकांसाठी सध्या स्मार्ट मीटर बसविण्यात येत नाहीत. स्मार्ट मीटर हा आता इतका चर्चेचा विषय झाला असल्याने त्याबद्दलच्या शंका दूर करणे गरजेचे आहे. त्यामुळेच या लेखाद्वारे स्मार्ट मीटरबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे.

पूर्वी टेलिफोन म्हटले की लँडलाइन फोन होता. ज्याचे काम संभाषणापुरतेच मर्यादित होते. कालांतराने स्मार्ट फोन आला. या फोनमुळे संभाषणाबरोबरच, मेसेज पाठविणे, सर्च इंजिनचा वापर करून माहिती प्राप्त करणे, छायाचित्रे टिपणे, आवाज रेकॉर्ड करणे, व्हिडीओ चित्रित करणे अशा अनेक बाबी करता येऊ लागल्या. स्मार्ट मीटर हे आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाने युक्त असे विजेचे मीटर

आहेत. त्यामध्ये ग्राहकांचा वीजवापर मोजला जाईल आणि दूरवर असलेल्या सर्व्हरमध्ये त्याची आपोआप नोंद होईल. आपल्या मोबाइलचा वापर हा सेवा देणाऱ्या कंपनीकडे आपोआप नोंदविला जातो, त्याप्रमाणेच.

**अचूक आणि त्वरित नोंदी**

स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना त्यांचा वीजवापर दर मिनिटाला त्यांच्या मोबाइल फोनवर जाणून घेण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. अत्यंत अचूक व पारदर्शीपणे रीडिंग हे स्मार्ट मीटरचे वैशिष्ट्य आहे. त्याच्या वापरामुळे वीज ग्राहकांच्या मीटरचे रीडिंग चुकीचे घेतले, रीडिंग नियमितपणे घेतले नाही, अचानक जास्त वीज वापराचे बिल आले, इतका वीज वापर झाला आणि मला समजलेच नाही अशा बिलिंगबाबतच्या समस्या संपूर्णपणे संपुष्टात येणार आहेत. तसेच वीज कंपनीकडे प्रत्येक ग्राहकाच्या विजेच्या वापराची अचूक नोंद झाल्यामुळे वीज बिल वसुली आणि वीजपुरवठ्याचे व्यवस्थापन यामध्ये क्रांतिकारी सुधारणा करता येतील. स्मार्ट मीटर हे जगभर सिद्ध झालेले तंत्रज्ञान आहे व सध्या ते भारतात आसाम, बिहार, मध्य प्रदेश, जम्मू काश्मीर आदी राज्यांत वापरले जात आहे. केंद्र सरकारच्या आरडीएसएस या वीजपुरवठा पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमाअंतर्गत राज्यात स्मार्ट मीटर बसविण्याची योजना आहे व त्यासाठी केंद्राकडून आर्थिक मदत मिळत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, स्मार्ट मीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे. त्यांना त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारे शुल्क आकारले जाणार नाही, हे आधीच स्पष्ट करण्यात आले आहे.

**वीज महाग होईल हा अपप्रचार**

स्मार्ट मीटर लावल्यानंतरही विजेचे दर आहेत तेवढेच राहणार आहेत. विजेचे दर ठरविण्याचा अधिकार ‘महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा’ला असतो. हे दर महावितरण ठरवू शकत नाही. परिणामी स्मार्ट मीटरमुळे वीज महाग होईल हा अपप्रचार आहे. महावितरणच्या माध्यमातून बसविण्यात येणाऱ्या स्मार्ट मीटरची किंमत सहा हजार १३६ रुपये आहे. हे सहा हजार रुपयांचे मीटर १२ हजार रुपयांना घेतले, या अपप्रचाराला काही अर्थ नाही. मीटर बसविणाऱ्या खासगी एजन्सीला दहा वर्षे मीटरची देखभाल दुरुस्ती करणे, निर्मितीच्या दोषामुळे मीटरमध्ये बिघाड झाल्यास ते मोफत बदलणे, रीडिंग उपलब्ध करून देणे तसेच ग्राहकांना सेवा देणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागणार आहे आणि एजन्सीला त्यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार आहे. त्या दृष्टीने विचार केला तर झारखंडमध्ये स्मार्ट मीटरसाठी ११ हजार ८८५ रुपयांची तरतूद, आंध्र प्रदेशात १३ हजार ६२५ रुपयांची, बिहारमध्ये १२ हजार ७६६ रुपयांची तर मिझोराममध्ये १३ हजार ४९५ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याचा विचार केला तर महाराष्ट्रातही कमी दरात स्मार्ट मीटर उपलब्ध होत आहेत. अशीही अफवा पसरविण्यात आली आहे की, स्मार्ट मीटर बसविण्यासाठी महावितरणकडून १६ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात येणार आहे व त्याचा बोजा ग्राहकांवर पडून वीज दरवाढ होईल. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, स्मार्ट मीटरसाठीचे पैसे संबंधित कंपन्यांना दहा वर्षांत टप्प्याटप्प्याने द्यायचे आहेत व जेवढे मीटर बसतील तेवढ्या मीटर्सचेच पैसे द्यायचे आहेत. स्मार्ट मीटरसाठी द्यावे लागणारे पैसे महावितरणला आपल्या स्वत:च्या महसुलातून देता येतील व त्यासाठी स्वतंत्र कर्ज काढावे लागणार नाही. स्मार्ट मीटरमुळे वीज क्षेत्राचे खासगीकरण होईल, हा अपप्रचार आहे. ग्राहकांसाठी बसविलेले पारंपरिक मीटर काढून त्या जागी स्मार्ट मीटर बसविल्याने कंपनीची मालकी बदलून ती खासगी कशी होईल? वर्षभरापूर्वी प्रीपेड मीटर स्वीकारावे यासाठी आवाहन करणाऱ्या ‘महाराष्ट्र वीज ग्राहक संघटने’च्या होगाडे यांनी ग्राहकांना ही सुविधा मोफत मिळविण्याची संधी निर्माण झाली असताना अचानक निराधार मुद्द्यांवरून विरोध सुरू केला आहे. त्यांनी मांडलेले अपप्रचाराचे मुद्दे वापरून राजकारणासाठी वातावरण तापविण्यात येत आहे. स्मार्ट मीटरबाबत प्रताप होगाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या अपप्रचाराला बळी पडू नये, असे माझे सर्वसामान्य वीज ग्राहकांना आवाहन आहे. वीज ग्राहकांसाठी बसविण्यात येणारे विजेचे स्मार्ट मीटर हे अचूक बिलिंग, वीजवापराची नियमित माहिती व खर्चावर नियंत्रण ठेवण्याची सुविधा यामुळे वरदान ठरणार आहेत. स्मार्ट मीटरच्या वापरामुळे भविष्यात वीजवापराच्या वेळेनुसार कमी दरात वीज मिळण्याची सुविधाही उपलब्ध करता येणार आहे. स्मार्ट मीटरचे अनेक लाभ आहेत. बिहारच्या ग्रामीण भागात यशस्वी ठरणारी ही योजना महाराष्ट्रातही यशस्वी होईल, असा विश्वास वाटतो, त्यामुळेच या योजनला विरोध करणे योग्य ठरणार नाही. ■

# एकच लक्ष्य... नवीन मतदार नोंदणी...

● सुधीर देऊळगावकर, संयोजक, निवडणूक विभाग-प्रदेश भाजपा

> निवडणूक आयोगाने २४ जुलैपर्यंत मतदार यादी दुरुस्ती व मतदार नोंदणी कार्यक्रम जाहीर केला आहे. या काळात आपल्याला जास्तीत जास्त संख्येने मतदार नोंदणी करावयाची आहे. विधानसभा निवडणुकीत विजय मिळवण्याचा निर्धार करून आपण मैदानात उतरलो आहोत. हा निर्धार प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्याला नवीन मतदार नोंदणीबरोबरच ज्या आपल्या समर्थक मतदारांची नावे लोकसभा निवडणुकीच्या मतदार यादीतून वगळली गेली होती त्यांची नावे मतदार यादीत पुन्हा समाविष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे.

● भारतीय निवडणूक आयोग यांचे दि. २०. ०६. २०२४ च्या पत्रान्वये मतदार नोंदणी व मतदार यादी दुरुस्ती करणे याबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

● मतदार यादीची अर्हता दि. ०१. ०७. २०२४ च्या अनुषंगाने जेवढे अर्ज मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे प्रलंबित असतील ते सर्व अर्ज या तारखेपर्यंत स्वीकारण्यात येऊन त्यावर अंतिम निर्णय घेण्यात यावा, असे आदेश निवडणूक आयोगाने दिलेले आहेत. त्या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ज्या अनु. क्र. १ ते ८



याप्रमाणे BLO ने मतदान केंद्रनिहाय एक महिन्याच्या आत संपूर्ण मतदार यादी अद्ययावत करुन निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करणे अनिवार्य आहे.

● निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार BLO यांनी मतदाराच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन (House to house filled verification) बुथच्या यादीचा अभ्यास करावा. त्यामध्ये वगळलेली नांवे, (Electros deletion as on २३.०१.२०२४) मृत पावलेली नांवे, दुबार नोंदणी असलेली नांवे (Photo similar and demographic similar entries as on २३.०१.२०२४), Recasting of Section / Parts and finalization of proposed restructuring of section / part boundary's location of polling stations, Rationalization / Re-arrangement of polling stations, मतदान केंद्रामध्ये एका घरातील कुटुंबाची वेगवेगळ्या मतदान केंद्रावर असलेली नांवे एकाच केंद्रावर आणणे व वसाहतीतील मतदारांची नांवे त्याच वसाहतीत असलेल्या मतदान केंद्रावर नोंद करणे, इतर ठिकाणी गेलेली नांवे एकाच ठिकाणी एकत्रितपणे मतदान केंद्रावर असणे तसेच मतदारांचे पत्ते पूर्ण अद्ययावत करणे, Improvement of image quality of photographs, Removal of discrepancies in the Electoral roll / EPIC नंबर दुबार असल्यास त्याची दुरुस्ती करणे, नवीन मतदार नोंदणीसाठी Form No.६भरुन घेणे, त्या मतदान केंद्रावर मतदार रहात नसेल तर त्याचे नांव वगळण्यासाठी Form




No.७ भरणे, मतदारांचा पत्ता बदलणे अथवा मतदार घर सोडून दुसरीकडे रहावयास गेले असल्यास संबंधित मतदारांचे फोटो, पत्त्यासह कागदपत्रे एकत्रित करुन त्या मतदारांनी Form No.८ भरणे व BLO ने Verification करणे अनिवार्य आहे. No family is broken and all register family members are kept in the same section and at the same place, location of polling station on ground floor will also be insured तसेच प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यापूर्वी मतदान केंद्रातील सर्व मतदारांचे address, photographs, EPICs shall be completed in a time bound manner. अशाप्रकारे प्रारुप मतदार यादी ०१.०७.२०२४ च्या अर्हता दिनांकानुसार पूर्तता करणे. ही सर्व कामे BLO यांनी दि. २५.०६. २०२४ ते २४.०७. २०२४ या दरम्यान पूर्ण करणे अनिवार्य आहे.

● प्रारुप मतदार यादी दि. २५ जुलै २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

● सदर प्रारुप यादीवर हरकती व सूचना याकरिता दि. २५.०७.२०२४ ते दि. ०९.०८.२०२४ पर्यंत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी आक्षेप नोंदविता येतील.

● नवीन मतदार नोंदणीकरिता Special campaign dates - Saturday and Sunday with in claims and objections period (to be fixed by the CEO)

● प्रारुप मतदार यादीवर आलेल्या आक्षेपांचे निराकरण व अंतिम निर्णय दि. १९.०८.२०२४ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत.

● अंतिम मतदार यादी ही दि. २०.०८.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

● दि. २५.०६.२०२४ रोजी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन खालीलप्रमाणे शिफारसीवजा सूचनांची नोंद घेऊन निवडणूक आयोगाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

● यामध्ये– अ) मतदार नोंदणीकरिता वेळ कमी असल्याने जरी निवडणूक आयोगाच्या २०.०६.२०२४ च्या पत्रानुसार House to house verification हा मुद्दा असून सुध्दा BLO House to house verification करु शकणार नाही, तो फक्त ज्या ठिकाणी नांव Delete झालेले आहे अथवा २३.०१.२०२४ च्या मतदार यादी प्रसिध्द करण्यापूर्वी BLO यांनी मतदार यादीतील नांवे वगळणी प्रक्रिया मतदारांच्या गृहभेटी घेऊन, नोटीस पाठवून पूर्ण तपासणीअंती कायदेशीररित्या करण्यात येऊन मतदार यादीतील नांवे वगळलेली आहेत; अशा मतदान केंद्रातील ज्या तक्रारी आल्या असतील त्या ठिकाणी फक्त BLO House to house verification करतील. त्यामुळे संपूर्ण मतदार यादीमधील नावांबाबत पुन्हा सर्वेक्षण होणार नाही.

ब) ज्या मतदारांकडे मतदार ओळखपत्र आहे, त्यावर EPIC नंबर आहे, परंतु त्याचे नाव मतदार यादीत नाही त्यामुळे त्याला लोकसभा निवडणुकीत मतदान करता

आले नाही याबाबतचे स्पष्टीकरण निवडणूक आयोगाने दिले असून त्यांचे स्पष्ट निर्देश आहेत की, मतदार ओळखपत्र हे फक्त आयडी प्रुफ म्हणून वापरले जाते. ते मतदान करण्यासाठी पुरावा होऊ शकत नाही. जोपर्यंत त्याचे नांव मतदार यादीत समाविष्ट नाही तोपर्यंत तो मतदान करू शकणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. परिणामी अशा सर्व मतदारांना पुनःश्च फॉर्म भरणे अनिवार्य आहे.

● मतदान केंद्र - (Rationalization of polling stations and formation of sections.) या अंतर्गत para 7.4 - Sr.No.3 Polling station having more than 1500 electors, shall be rationalized / modified as per the given schedule before the draft publication of electors rolls, in accordance with instructions contain in manual of polling station २०२०. याबाबत मतदान केंद्राची मतदारांची संख्या १००० पर्यंत करण्याबाबतची सूचना निवडणूक आयोगाने मान्य केली असून त्या बाबतचा प्रस्ताव भारत निवडणूक आयोग यांच्याकडे पाठविण्यात येईल, अशी सूचना मुख्य निवडणूक आयुक्तांनी केली.

● नवीन मतदान केंद्र मंजूर करणे अथवा मतदान केंद्राची जागा बदलणे या करिता आयोगाकडून १००% पडताळणी व निरिक्षण केल्यानंतरच सदर मतदान केंद्रास मंजुरी देण्यात येईल, अन्यथा ही बाब ग्राह्य धरण्यात येणार नाही. शहरातील मतदारांची टक्केवारी वाढविण्यासाठी मोठ्या गृहनिर्माण संकुलामध्ये नवीन मतदान केंद्र मंजूर करण्याकरिता त्या ठिकाणी सार्वजनिक हॉल / Common facilitation area at ground floor या ठिकाणी BLO d BL यांनी संयुक्तरित्या पाहणी करुन जागा निश्चित करणे व त्या मतदान केंद्रावर त्याच भागातील मतदार यांची नांवे येण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे आणि सोसायटीच्या सहमती पत्रासह या संदर्भात एक आठवड्यामध्ये राजकीय पक्षाकडून प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. याबाबत सर्वांनी गांभीर्याने विषय घेऊन प्रदेश कार्यालयाकडे प्रस्ताव द्यावा, ही विनंती.

● मतदान केंद्र अद्ययावत करणे, मतदान केंद्रावरील सुविधा तसेच मतदान केंद्र हे १५०० मतदारांचे असल्यास ते कमी करुन ८००-१००० पर्यंत करणे. याकरिता पक्षाच्या BL यांनी स्वतः BLO सोबत मतदान केंद्राची पाहणी करणे आणि समाधान झाल्यानंतरच BLO ने तयार केलेल्या निरिक्षण अहवालावर स्वाक्षरी करणे अथवा आक्षेप नोंदविणे.

● लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये राज्याची एकूण मतदार संख्या ९,२०,३१,०७० एवढी होती आणि मतदान केंद्र ९८,१०० एवढे होते.

● विधानसभा निवडणुकीत प्रत्येक बूथवर विधानसभानिहाय नवीन मतदार नोंदणी करणे, मतदान केंद्राची संख्या वाढविणे, १५०० चा बूथ असल्यास तो कमी करणे, प्रत्येक बूथ प्रमुखांकडून नवीन मतदार नोंदणीचे फॉर्म भरल्यानंतर BLO च्या मार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करणे. प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यापूर्वी सदर जमा केलेल्या फॉर्ममधील नांवे मतदार यादीत आली किंवा नाही याची प्रत्यक्षरित्या तपासून माहिती घेणे व नांव आले नसल्यास त्वरीत त्यावर आक्षेप नोंदविणे. जास्तीत जास्त मतदार नोंदणी कशी करता येईल याकरिता बूथ प्रमुखांनी काळजी घेणे आवश्यक आहे.

प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर प्रत्येक राष्ट्रीय स्तरावरील पक्षाला निःशुल्क यादीची प्रत मिळते त्याकरिता आपल्या पक्षाच्या जिल्हा अध्यक्षांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे लेखी पत्र देऊन प्रारुप मतदार यादीची प्रत ताब्यात घ्यावी व ती त्वरीत मतदान केंद्रनिहाय तपासण्याकरिता बूथ प्रमुखाकडे देण्यात यावी. जेणेकरुन अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यापूर्वी बूथ प्रमुखाकडून मतदार यादीचा अभ्यास पूर्ण होईल व त्यातील अपूर्ण माहिती पूर्ण करण्यास मदत होईल.

निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या निर्देशानुसार आपण सर्वांना आपली विधानसभानिहाय मतदार यादी अद्ययावत करणे, मतदान केंद्राची निश्चित करणे, मतदान केंद्रावरील सुविधा त्याचप्रमाणे मतदान केंद्राची संख्या वाढविणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे फक्त एक महिन्याचा कालावधी शिल्लक आहे. त्याकरिता आपण सर्वांनी या बाबीकडे अत्यंत गंभीरतापूर्वक लक्ष घातल्यास हे काम पूर्ण होण्यास निश्चित कमी कालावधी लागेल.

● सप्टेंबर २०२४ च्या दुसऱ्या वा तिसऱ्या आठवड्यात निवडणूक आयोग विधानसभेच्या आचारसंहितेबाबत घोषणा करू शकतात. ■

# नालंदा विद्यापीठाच्या नवीन कॅंपसचे उद्‌घाटन




● अभिजित जोग

> पाचव्या शतकात गुप्त साम्राज्याच्या काळात स्थापन झालेलं नालंदा विद्यापीठ प्राचीन जगातलं ज्ञानार्जनाचं एक महान केंद्र होतं. नालंदा विद्यापीठाच्या भव्य परिसरात दोन हजार अध्यापक कोरिया, जपान, ग्रीस, इंडोनेशिया, कंबोडिया, चीन, पर्शिया इथून आलेल्या दहा हजार विद्यार्थ्यांना विविध विषयांचं ज्ञानदान करत असत.

**इ.स.** ११९३ साली बख्तियार खिलजी या धर्मांध आक्रमकाने या विद्यापीठाला आग लावली, अध्यापकांची कत्तल केली व संपूर्ण विध्वंस केला. इथल्या ग्रंथालयातील ९० लाख ग्रंथ तीन महिने जळत होते. इतिहासकार मिनाझ– ई– शिराझ याने त्याच्या तबाकत – ई – नसीरी या ग्रंथात खिलजीने केलेली कत्तल, तलवारीच्या धाकाने घडवलेलं धर्मांतर आणि ग्रंथालयाचा संहार याविषयी लिहून ठेवलं आहे. अशा या वैभवशाली विद्यापीठाचं पुनर्निर्माण हा देशासाठी गौरवाचा क्षण आहे. पण देशाच्या आनंदात मोकळ्या मनाने सामील झाले तर ते काँग्रेसवाले कसले! त्यांनी लगेच मनमोहन सिंग यांच्या काळात सुरू झालेल्या या प्रकल्पाचे उद्घाटन मोदींनी केले असा गलका सुरू केला. खरंतर अशा आनंदाच्या प्रसंगी राजकीय चिखलफेक व्हायला नको. पण मोदीद्वेषातून सांगितलेलं हे असत्य, सत्य म्हणून प्रस्थापित होऊ नये यासाठी खरं काय हे समजून घेतलंच पाहिजे.

२००६ साली तत्कालीन राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी नालंदा विद्यापीठाचे पुनरुज्जीवन केले जावे अशी सूचना केली. त्यावर या पुनरुज्जीवनाची रूपरेषा ठरविण्यासाठी मनमोहनसिंग सरकारने अमर्त्य सेन यांच्या अध्यक्षतेखाली ’ नालंदा मेंटॉर ग्रुप’ची, जून २००७ मध्ये



स्थापना केली व त्यांना तीन महिन्यात अहवाल देण्यास सांगितले. अमर्त्य सेन यांची मुस्लिम आक्रमकांबद्दलची मतं, त्यांचे अत्याचार लपवणारी आणि नाकारणारी होती. त्यामुळे बख्तियार खिलजीच्या धर्मांधपणामुळे नष्ट झालेले नालंदा विद्यापीठ पुन्हा उभे करण्यासाठी त्यांची निवड अयोग्यच होती. त्यानुसार तीन महिन्यात काहीच घडले नाही. त्यावर नऊ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. या नऊ महिन्यातही अहवालाचा जन्म झाला नाही म्हटल्यावर तब्बल तीन वर्षांची मुदतवाढ देण्यात आली. शेवटी २०१२ साली अमर्त्य सेन यांचीच कुलपती म्हणून नेमणूक झाली आणि एखाद्या तलाठ्याचं ऑफीस वाटावं अशी एक इमारत तिथे उभी राहिली. अशाच ढिसाळ आणि बेमुर्वतखोर पद्धतीने चालढकल सुरू राहिली आणि २०१४ पर्यंत या प्रकल्पाची काहीही प्रगती झाली नाही.

दरम्यान खर्च मात्र बेबंदपणे होत गेला. बैठका अमर्त्य सेन यांच्या सोयीसाठी न्यूयॉर्क, टोकियो, सिंगापूर येथे होत राहिल्या. इतक्या महत्वाच्या विद्यापीठाच्या कुलगुरूपदी एखाद्या नामवंत विद्वानाची नेमणूक करण्याऐवजी दिल्लीतील एका महाविद्यालयात साध्या रीडर असलेल्या गोपा सबरवाल यांची वर्णी लावण्यात आली. २००७ ते २०१४ दरम्यान २७३० कोटी रुपये खर्च झाला आणि हाती काहीच लागलं नाही. या सर्व व्यवहारावर कॅगने कठोर ताशेरे ओढले. स्वतः राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी परराष्ट्रमंत्री कृष्णा यांना पत्र लिहून या प्रकल्पासाठी खऱ्याखुऱ्या विद्वानांची नियुक्ती केली जावी आणि त्यांनी नालंदा इथे हजर रहावं अशी अट घालण्यात यावी अशी सूचना केली. शेवटी नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात या प्रकल्पावर खऱ्या अर्थाने काम सुरू झाले. आता जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ अरविंद पानगढिया हे कुलपती तर प्रा. अभय कुमार सिंग हे कुलगुरू म्हणून नालंदाचे नेतृत्व करत आहेत.जागतिक कीर्ती प्राप्त करून गतवैभवाला पोचण्याच्या दिशेने नालंदाची वाटचाल आता सुरू झाली आहे. ■

# ‘ब्रेक द नॅरेटिव्ह’चे प्रदेशाध्यक्षांच्या हस्ते विमोचन



लोकसभा निवडणुकीत काँग्रेसकडून संविधानविरोधी नॅरेटिव्ह सेटिंगचे राजकारण करण्यात आले. या दिशाभुल करणाऱ्या राजकारणाच्या प्रत्युत्तरात भारतीय जनता पार्टीद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात आलेल्या मोहिमेचा अहवाल प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांचेद्वारे ‘ब्रेक द नॅरेटिव्ह’ नावाने प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालाचे विमोचन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी मंचावर राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल, सांस्कृतिक कार्य, वने व मत्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, विदर्भ प्रदेश संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर आदी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीद्वारे जनतेपुढे अनेक विकासाचे मुद्दे पुढे ठेवण्यात आले. यासोबतच ‘अब की बार ४०० पार, फिर एक बार मोदी सरकार’ हा नारा देण्यात आला. मात्र विरोधकांकडून याबाबत अपप्रचार करीत संविधान बदलविण्यासाठी ‘४०० पार’चा नारा देण्यात येत असल्याचा मुद्दा पुढे करून जनतेची दिशाभूल करण्यात आली. विरोधकांच्या या नॅरेटिव्ह सेटिंगविरोधात राज्यात नॅरेटिव्ह तोडण्याची मोहिम राबविण्यात आली. यात प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीप कांबळे, माजी मंत्री राजकुमार बडोले, माजी आमदार सुधीर पारवे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार तथा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. मिलींद माने यांनी महाराष्ट्रातील विविध लोकसभा क्षेत्रात मोहिम चालविली. राज्यातील १५ लोकसभा मतदार संघातील ९० पेक्षा अधिक विधानसभा क्षेत्रात प्रवास करून तिथे ३० पेक्षा अधिक पत्रकार परिषद घेतल्या व काँग्रेसच्या संविधानाबाबतच्या नॅरेटिव्ह सेटिंगचा बुरखा फाडण्यात आला. याशिवाय ४० हजार समाजजागृती पत्रक वाटून संविधानाबाबत सुरू असलेल्या अपप्रचारातील वास्तव पुढे ठेवले. आंबेडकरी चळवळीतील विविध ठिकाणच्या व्यक्तींशी भेट घेऊन त्यांच्याशी देखील संवाद साधण्यात आला. या संपूर्ण काळातील कार्य आणि यात सहभागी व्यक्तींना दिलेल्या जबाबदाऱ्या या सर्वांचा अहवाल ‘ब्रेक द नॅरेटिव्ह’च्या रुपात जनतेपुढे सादर करण्यात आलेला आहे. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय) माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष प्रा. संजय भेंडे, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, ॲड. माधवी नाईक, संजय केनेकर, विजय चौधरी, मुख्यालय प्रभारी रवी अनासपुरे, प्रदेश सहकार्यालय मंत्री संजय फांजे, अनुसूचित जाती मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अशोक मेंढे, नागपूर शहर महामंत्री विष्णू चांगदे, प्रदेश सचिव सरीता गाखरे, मुख्य प्रवक्ते, केशव उपाध्ये, सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक आदी उपस्थित होते. ■

# सरकार कोणाचे आहे, याने कसा फरक पडतो बघा...

मधल्या अडीच वर्षांच्या काळात राज्यात महाविकास आघाडी सरकार नसते, तर आत्तापर्यंत मुंबई मेट्रोचा संपूर्ण प्रकल्प पूर्ण होऊन लाखो मुंबईकरांचे जीवन सुसह्य झाले असते.

● मुंबईत या महिन्यात पहिली जमिनी खालून मेट्रो लाईन सुरू होत आहे, जी मुंबईच्या वाहतूक नेटवर्कमध्ये एक गेम चेंजर असेल.

● ही नवीन मेट्रो लाईन शहरातील गजबजलेल्या 'रस्त्यांखाली' ३३.५ किलोमीटर पसरलेली आहे.

● या मेट्रो प्रकल्पामध्ये ३३.५ किलोमीटर लांबीचा बोगदा समाविष्ट आहे जो आरे कॉलनीपासून सुरू होतो. यात २७ स्थानके असणार आहेत, ज्यापैकी २६ अंडर-ग्राउंड असणार आहेत.

● विधानभवन, चर्चगेट, सीएसटी, मेट्रो, काळबादेवी, मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, कफ परेड, हुतात्मा चौक, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक, डोमेस्टिक एअरपोर्ट, सहार रोड, गिरगाव, ग्रँट रोड, वरळी, सिद्धिविनायक, दादर, शितलादेवी, धारावी, बीकेसी, विद्यानगरी, सांताक्रूझ, आंतरराष्ट्रीय विमानतळ, मरोळ नाका, एमआयडीसी, सीप्झ आणि आरे डेपो ही स्थानके असणार आहेत.

● पहिला टप्पा जुलैमध्ये मुंबईकरांच्या सेवेत रुजू होणार आहे आहे, तो आरे कॉलनी ते बीकेसी (वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स) पर्यंत जातो.

● सकाळी ६:३० ते रात्री ११:०० दरम्यान दर काही मिनिटांनी एक,असे दररोज २६० सेवा मुंबई मेट्रो चालवेल.

● एकूण ३५ किलोमीटरच्या प्रवासासाठी आज साधारणपणे कारने दोन तासांपेक्षा जास्त वेळ लागतो, ते अंतर मेट्रोने केवळ ५० मिनिटात पूर्ण होईल.



● दुसऱ्या टप्प्यासह संपूर्ण प्रकल्प पुढील आठ महिन्यांत पूर्ण होईल.

● आरे कारशेडचे काम ठाकरे कुटुंबियांनी काही 'एनजीओ'ना हाताला धरून आधी बंद पडले. मग स्वतः सत्तेत असताना ते कारशेड कांजूरमार्गला नेण्याचा घाट घातला, जो कोर्टाने हाणून पाडला.

● ही सगळी थेरं ही लोकं करत असताना, याकाळात 'प्रोजेक्ट कॉस्ट' १०००० कोटींनी वाढली ज्याचा भुर्दंड शेवटी मुंबईकर टॅक्स-पेयर्स ना भरावा लागला.

● त्याव्यतिरिक्त, हा प्रकल्प अडीच वर्षे उशिराने पूर्ण होत असल्याने मुंबईकरांचे हाल पण झाले. तरी याकाळात मुंबईकरांनी ट्राफिक-जाममध्ये बसून काही तरी ते त्यांचे फालतू 'स्पिरिट ऑफ मुंबई' वगैरे म्हणत कोट्यवधी रुपयांच्या जाळलेल्या पेट्रोल-डिझेलचा हिशोब, लाखो लोकांचे रोजचे कित्येक कोटी 'मॅन-अवर्स' आणि प्रदूषणामुळे झालेले नुकसान यात आपण मोजतच नाहीये. ज्या 'इन्फ्रामॅन' देवेंद्र फडणवीस यांच्या काळातच हा महत्वकांक्षी व मुंबईसाठी अत्यावश्यक असलेला प्रकल्प सुरू झाला होता व वेगात काम झाले होते, त्या प्रकल्पाला आता तेच देवेंद्र फडणवीस स्वतः जातीने लक्ष घालून पूर्णत्वाला नेत आहेत. 'कोणाचेही सरकार सत्तेत असले तरी आपल्या सारख्या सामान्य माणसाला काय फरक पडतोय', असं म्हणत मतदानाच्या दिवशी मतदान सोडून सगळं काही करणाऱ्या मुंबईकरांनी, आणि 'मराठी अस्मितेच्या' मुद्द्यावर भावनिक होऊन मतदान करणाऱ्यांनी आता तरी आपले लोकप्रतिनिधी निवडताना थोडा विचार करावा. ■

# काश्मीरमध्ये लवकरच उभारणार महाराष्ट्र सदन




**महाराष्ट्र** शासनाच्या वतीने काश्मीरमध्ये आता लवकरच महाराष्ट्र सदन उभारण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. त्यादृष्टीने काश्मीरमध्ये जमीन खरेदी करण्यासाठी विभागाच्या वतीने ९ कोटी ३० लाख २४ हजार रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली. जम्मू आणि काश्मिर सरकारने बडगाम जिल्ह्यातील इचगाम तालुक्यातील २.५० एकर (२० कॅनल) जमीन महाराष्ट्र सरकारला तेथे महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी प्रदान केलेली आहे. जमीन खरेदीची प्रक्रिया महाराष्ट्र व जम्मू-कश्मीर सरकार यांच्यावतीने पूर्ण झाली आहे.

महाराष्ट्र सदन उभारण्याच्यादृष्टीने दोन्ही राज्यात आवश्यक प्रक्रिया करण्याच्यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आता या भूखंडावरील त्या जागेवर उभे राहणारे महाराष्ट्र सदन कश्या स्वरुपाचे असावे व त्यामध्ये कोणत्या सोयी-सुविधा असतील याच्या नियोजन व आराखड्याची प्रक्रिया सुरु आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष महाराष्ट्र सदन उभारणीच्या कामाला सुरुवात होईल व लवकरच कश्मिरमध्ये महाराष्ट्र सदन उभे राहिल असा विश्वास मंत्री चव्हाण यांनी व्यक्त केला. बडगाम येथे महाराष्ट्र सरकारच्यावतीने बांधण्यात येणाऱ्या महाराष्ट्र सदनासाठी आवश्यक असलेल्या २.५० एकर जमिनीसाठी महाराष्ट्र सरकारने ९ कोटी ३० लाख २४ हजार रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे, अशी माहिती मंत्री चव्हाण यांनी दिली. ■

# वाढवणला होणार 76 हजार कोटींचे बारमाही ग्रीनफिल्ड डीपड्राफ्ट बंदर

**प्रधानमंत्री** नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळील वाढवण येथे ७६,२०० कोटी रुपये मूल्याचे बारमाही ग्रीनफिल्ड डीपड्राफ्ट प्रमुख बंदर उभारण्यास मंजुरी दिली. जगातील पहिल्या दहा बंदरांपैकी एक म्हणून हे बंदर उभे राहील. या प्रकल्पाची अंमलबजावणी जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) आणि महाराष्ट्र सागरी मंडळ (एमएमबी) यांच्या सहकार्याने स्थापन केलेल्या वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) द्वारे करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत बंदर आणि राष्ट्रीय महामार्गांदरम्यान रस्ता कनेक्टिव्हिटीची स्थापना आणि विद्यमान रेल्वे नेटवर्कशी जोडणी केली जाईल. यासोबतच, रेल्वे मंत्रालयाद्वारे आगामी समर्पित रेल्वे फ्रेट कॉरिडॉरही विकसित केला जाईल. या प्रकल्पाच्या खर्चात भूसंपादन घटकाचा समावेश आहे. केंद्र सरकारच्या एकूण ७६,२२० कोटी रुपये खर्चाच्या नवीन बंदर प्रकल्पामुळे भारताचा जागतिक एक्सिम व्यापार प्रवाह सुधारेल. आयएमईईसी (इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर) आणि आयएनएसटीसी (इंटरनॅशनल नॉर्थ साउथ ट्रान्सपोर्टेशन कॉरिडॉर) द्वारे या बंदराची क्षमतावाढ, आंतरराष्ट्रीय व्यापाराला भक्कम पाठबळ देणारा ठरेल. या बंदरात १,००० मीटर लांबीचे नऊ कंटेनर टर्मिनल्स, चार लिक्विड कार्गो बर्थ, एक रो-रो बर्थ, एक तटरक्षक धक्का आणि चार बहुउद्देशीय धक्के यांचा समावेश आहे. यासोबतच, १,४४८ हेक्टर क्षेत्राचे पुनर्वसन, १०.१४ किमी ऑफशोअर ब्रेकवॉटर आणि कंटेनर/कार्गोद स्टोरेज क्षेत्रांचे बांधकाम करण्यात येणार आहे. प्रकल्पामुळे प्रत्येकवर्षी २९८ दशलक्ष मेट्रिक टन (एमएमटी) संचयी हाताळणी क्षमता आणि २३.२ दशलक्ष TEUs कंटेनर हाताळणी क्षमता निर्माण होईल. हा बंदर प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) ला प्रोत्साहन देऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करेल आणि सुदूर पूर्व, युरोप, मध्य पूर्व, आफ्रिका आणि अमेरिकासारख्या देशांमध्ये जलमार्गाने जाणाऱ्या मोठ्या जहाजांना हाताळण्यास सक्षम असेल. वाढवण बंदर पूर्ण झाल्यानंतर जगातील पहिल्या दहा बंदरांपैकी एक म्हणून ओळखले जाईल, ज्यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय सागरी व्यापार क्षमतेला एक नवा आयाम मिळेल. ■





मुंबई– पक्ष प्रवेश– प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, अतुल बाबा भोसले यांच्या नेतृत्वात मलकापूर नगरपालिकेचे माजी बांधकाम सभापती राजेंद्र यादव, महिला व बालकल्याण माजी सभापती गितांजली पाटील, स्वाती तुपे, अनिता यादव, शहाजी पाटील,समीर तुपे, विजय चव्हाण, मल्लाप्पा बामणे, राजूभय्या मुल्ला तसेच कराड दक्षिण येथील सामाजिक कार्यकर्ते अनिल कचरे, लातूर येथील सामाजिक कार्यकर्त्या माया मते, नवी मुंबई येथील सुनिता हिवराळे आणि सतविंदर कौर यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.



महालक्ष्मीतील वॉर्ड क्र. २१४ मधील पदवीधर मतदारांना भेटून महायुतीचे उमेदवार किरण शेलार यांच्या कार्याबद्दल माहिती दिली. तसेच मतदानाविषयी संपूर्ण माहिती दिली. यावेळी गिरीश छेडा, प्रेमजी पडाया, उदय लाड उपस्थित होते.




महायुतीचे उमेदवार किरण शेलार प्रभाग क्र. १७३ मधील पदवीधर मतदारांच्या घरोघरी जाऊन जाहीरनामा पत्रिका देऊन मतदान करण्याची प्रक्रियाची सविस्तर माहिती दिली. यावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य मदन डापसे उपस्थित होते.




मालेगाव– मंडल बैठक– उपस्थिती– पश्चिम मंडलाध्यक्ष व मालेगाव बाह्य विधानसभा प्रमुख देवा पाटील, ज्येष्ठ नेते सुरेश निकम, उत्तर महाराष्ट्र मतदार नोंदणी प्रमुख दादासाहेब जाधव, जिल्हा उपाध्यक्ष हरिप्रसाद गुप्ता, यु.आर.पाटील, जिल्हा महिला जिल्हाध्यक्षा सुरेखा भुसे, प्रतीक्षा भोसले, नलिनी पाटील, नीता पठाडे, स्वप्नील भदाणे, निलेश सोनवणे, पप्पू पाटील,  संदीप मोरे, मोनल मांडोळे, मोहन कांबळे, राजेंद्र गायकवाड, सुरेंद्र पहाडे, मनोहर आहिरे, निंबा आहिरे, नूर शेख.

# आणीबाणी विरोधात काळा दिवस




नवी दिल्ली– लोकतंत्र का काला दिवस– उपस्थिती– राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा, राष्ट्रीय संघटन मंत्री बी.एल.संतोष, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, दुष्यंत गौतम, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, राष्ट्रीय चिटणीस राधा मोहन अग्रवाल, राष्ट्रीय मीडिया सह प्रभारी डॉ. संजय मयूख, खासदार बांसुरी स्वराज आदी उपस्थित होते.



नांदेड– उपस्थिती– प्रदेश कार्यकारिणी सदस्य भरतभैया यादव, ज्येष्ठ नेते प्रभाकर पेटकर, अनिलसिंह हजारी अमोल कुलथिया, केदार नांदेडकर, राजकुमार परे, लक्ष्मीनारायण शर्मा, सतीश नंदाने आदी.



जालना– उपस्थिती – जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, सोपान पेंढारकर, जिल्हा सरचिटणीस सिध्दीविनायक मुळे, अतिक खान, अर्जुन गेही, धनराज काबलिये, शुभांगी देशपांडे, महादेव कावळे, शिवराज जाधव, बबनराव सिरसाठ, डॉ.सतिश्चंद्र प्रभु, इम्रान सय्यद, डोंगरसिंग साबळे, दत्ता जाधव, अमन मित्तल, रोहीत नलावडे, आनंद झारकंडे, गोविंद ढेंबरे, कुंडलिक खरात, विकास कदम, विठ्ठल नरवडे, सोमेश काबलिये आदी.

# 'आईच्या नावे एक झाड'

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' अर्थात 'आईच्या नावे एक झाड' मोहिमेचा शुभारंभ केला. पंतप्रधान मोदींनी 5 जून रोजी दिल्लीतील बुद्ध जयंती पार्कमध्ये पिंपळाचे झाड लावले. आपल्या पृथ्वीवर सुधारणा घडवून आणण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन सर्व देशवासियांना करताना त्यांनी सांगितले की गेल्या दशकात भारतात अनेक सामूहिक प्रयत्न केले गेले आहेत, ज्यामुळे संपूर्ण देशातील वनक्षेत्रात वाढ झाली आहे. शाश्वत विकासाच्या दिशेने आपल्या प्रयत्नांच्या दृष्टीने हे खूप चांगले आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.**

**गेल्या दशकात, भारतात अनेक सामूहिक प्रयत्न केले गेले आहेत, ज्यामुळे संपूर्ण देशातील वनक्षेत्रात वाढ झाली आहे. यामध्ये स्थानिक समाजानेही अग्रेसर भूमिका बजावली आहे, हे कौतुकास्पद आहे.**



जागतिक पर्यावरण दिनी, 'आईच्या नावे एक झाड' या नावाची मोहीम सुरु करताना मला खूप आनंद होत आहे. मी देशवासियांना तसेच जगभरातील लोकांना विनंती करतो की त्यांनी आपल्या आईला आदरांजली म्हणून एक झाड लावावे आणि 'plant for mother' किंवा 'आईच्या नावे एक झाड' असे नमूद करून स्वत:चे छायाचित्र पोस्ट करावे.
**नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp







**प्रति,**

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com